सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. ०६ एप्रिल २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३५७ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

थोडक्यात...

ग्रॅच्युईटीमध्ये वाढ होणार

मुंबई : १ एप्रिल २०२६ पासून लागू झालेल्या नवीन कर आणि श्रम नियमांमुळे कर्मचाऱ्यांच्या पगाराच्या रचनेत मोठे बदल होण्याची शक्यता आहे. यामुळे पगारातून जास्त पीएफ कापला जाणार का? असा प्रश्न अनेकांना पडला आहे. मात्र, मते थेट पीएफ दर वाढवण्यात आलेला नसला तरी पगाराच्या संरचनेतील बदलांमुळे पीएफ आणि ग्रॅच्युइटीमध्ये वाढ होऊ शकते. नवीन आयकर नियमांनुसार, कर्मचाऱ्यांच्या पगारातील भत्ते, सुविधा आणि इतर लाभ यांचे मूल्यांकन अधिक स्पष्टपणे केले जाणार आहे. यामुळे आधी करमुक्त असलेले अनेक भत्ते आता करपात्र ठरण्याची शक्यता आहे. परिणामी, कंपन्यांना कर्मचाऱ्यांच्या CTC (Cost to Company) मध्ये बदल करावे लागू शकतात.

अमेरिकेचा वरदहस्त कमी ?

कीव : पश्चिम आशियातील संकटाचा परिणाम जागतिक स्तरावर दिसून येत असून संपूर्ण जगात याबाबत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र या युद्धामुळे युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की विशेषतः तणावाखाली आहेत. झेलेन्स्की यांनी अशी भीती व्यक्त केली आहे की अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष दीर्घकाळ चालल्यास युक्रेनला मिळणारा अमेरिकेचा पाठिंबा कमकुवत होऊ शकतो. त्यांनी सांगितले की वॉशिंग्टनच्या प्राधान्यक्रमात बदल झाल्यामुळे युक्रेनला अत्यंत आवश्यक असलेल्या पॅट्रियट एअर डिफेन्स क्षेपणास्त्रांच्या पुरवठ्यात घट होऊ शकते.

१० एप्रिलला नितीश घेणार शपथ

पाटणा : बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार राज्यसभेत प्रवेश करण्यास सज्ज झाले आहेत. त्यांच्या शपथविधीची तारीखही निश्चित झाली आहे. बिहार भाजपचे प्रदेशाध्यक्ष संजय सरावगी यांनी नितीश यांच्या शपथविधीची तारीख जाहीर केली. ते म्हणाले, मुख्यमंत्री नितीश कुमार १० तारखेला राज्यसभा खासदार म्हणून शपथ घेतील. त्यांच्या शपथविधीनंतर भाजपचे केंद्रीय नेतृत्व, एनडीए आणि मुख्यमंत्री संयुक्तपणे निर्णय घेतील. परिणामी, बिहारच्या पुढील मुख्यमंत्र्यांबाबतचा निर्णय लवकरच घेतला जाऊ शकतो, असे मानले जात आहे.

बॉक्सिंग स्पर्धेचे उद्घाटन

नागपूर : नागपूरमध्ये सुरू असलेल्या ण-१७ राष्ट्रीय बॉक्सिंग चॅम्पियनशिपला आज एक वेगळीच उंची मिळाली, जेव्हा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून स्पर्धेचा भव्य शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात होताच संपूर्ण वातावरण उत्साहाने भारून गेले, आणि गडकरी यांनी स्टेजवरून खेळाडूंना दिलेल्या प्रेरणादायी संदेशाने स्पर्धेला नवा जोश मिळाला. या प्रसंगी प्रमोद कुमार बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे महासचिव, राहुल शेवाळे महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष, रणजीत सावरकर महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनचे उपाध्यक्ष, राकेश तिवारी महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनचे सचिव, मिलन वैद्य महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनचे कोषाध्यक्ष यांच्यासह आशिष जयस्वाल, कृपाल तुमाने, दीपक सावंत, संजय निरुपम, मनीषाताई कायंदे, किरण पांडव, श्रीमती देवांग आणि अर्जुन अवॉर्ड विजेते गोपाल देवांग यांची उपस्थिती होती.

एआय क्षेत्रात गुगलचा धमाका

मुंबई : तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपनी त्रेसश्रश ने आपले अत्याधुनिक आणि 'ओपन-सोर्स' कृत्रिम बुद्धिमत्ता मॉडेल Gemma 4 अधिकृतपणे सादर केले आहे. एप्रिल २०२६ मध्ये झालेली ही घोषणा संपूर्ण एआय उद्योगासाठी महत्त्वाचा टप्पा मानली जात आहे. विशेष म्हणजे, हे मॉडेल महागड्या सर्व्हरवर अवलंबून न राहता थेट स्मार्टफोनवर ऑफलाइन कार्य करू शकते, ही याची सर्वात मोठी जमेची बाजू आहे.


मारुती सुझुकीच्या विक्रीत वाढ

मुंबई : देशातील आघाडीची कार उत्पादक कंपनी मारुती सुझुकीने मार्च २०२६ महिन्यात विक्रीत उल्लेखनीय वाढ नोंदवली आहे. कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, मार्च २०२६ मध्ये एकूण २,२५,२५१ युनिट्सची विक्री

भोंदूबाबा अशोक खरातची ईडी चौकशी होणार - मुख्यमंत्री

तभा वृत्तसेवा

मुंबई, दि. ०५ एप्रिल : सध्या राज्यासह देशात चर्चेत असलेल्या नाशिकमधील भोंदू बाबा अशोक खरात याच्या काळ्या साम्राज्याचा पर्दाफाश करण्यासाठी विशेष तपास पथक अहोरात्र प्रयत्न करत आहे. शिर्डीतील जमीन फसवणूक प्रकरणात अशोक खरातची पत्नी कल्पना खरातला ताब्यात घेण्यासाठी एसआयटीचे पथक गेले असता ती पथकाला गुंगारा देण्यात यशस्वी ठरली. मात्र, यावेळी खरातचा मुलगा हर्षवर्धन खरात याला एसआयटीने चौकशीसाठी ताब्यात घेतले. SIT



ने त्याची कसून चौकशी केली.

सध्या अशोक खरात प्रकरणाबद्दल रोज नवनवीन माहिती समोर येत आहे. अशातच आता या प्रकरणाबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना मोठं वक्तव्य केलं आहे.

भोंदू अशोक खरात प्रकरणातील सर्व व्यवहारांची ईडी चौकशी होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. तसेच भोंदू अशोक खरातवर आतापर्यंत एकूण १२ गुन्हे दाखल झाले असल्याची माहिती देखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली आहे.

अशोक खरात प्रकरणाचा तपास सुरू आहे. अशोक खरातच्या संपत्तीची आणि गैरव्यवहारांची चौकशी केली जाईल. अशोक खरात प्रकरणात काही लोक राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहेत. पण मी स्पष्ट सांगतो की अशा प्रकरणाबाबत सरकारला जे करायला पाहिजे ते सरकार करत आहे, असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटलं आहे.

अशोक खरात प्रकरणातील सर्व व्यवहारांची ईडी चौकशी होणार का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. यावर बोलताना फडणवीस म्हणाले की, खरात प्रकरणातील व्यवहारांबाबत नक्कीच ईडी चौकशी होणार आहे. त्याबाबत ईडीने या गोष्टीची माहिती घेतली आहे. ईडीनेही त्यांची कारवाई सुरू केलेली आहे. एकदा खरातच्या जमिनी कुठे-कुठे आहेत, याची माहिती समजली



की नियमानुसार जे-जे करावं लागेल ते आम्ही करणार आहोत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे.

अशोक खरात प्रकरणातील सीडीआर कोणालाही प्राप्त करून घेण्याचा अधिकार नाही. तो अधिकार फक्त ज्या तपास यंत्रणा आहेत त्यांनाच तो अधिकार आहे. मात्र, या प्रकरणातील सीडीआर कसा लीक झाला? तो सीडीआर कोणी लीक केला? या संदर्भातील चौकशी राज्य सरकार करणार आहे. मला असं वाटतं की अशा प्रकारच्या प्रकरणात फक्त आरोप-प्रत्यारोप करून चालत नाही. ज्यांच्या विरोधात सबळ पुरावा असेल त्यांच्यावर कारवाई होईलच. मात्र, कोण-कोणाशी बोललं या आधारावर आपली क्रिमिनल जस्टिस सिस्टम चालत नाही, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात आठ दिवसांत मोठा भूकंप होणार, नाना पटोले यांचं भाकीत

तभा वृत्तसेवा

नागपूर, दि. ०५ एप्रिल : *भाजपचा आजवरचा इतिहास पाहिला तर त्यांनी नेहमीच आपल्या मित्रपक्षांना संपवण्याचे काम केले आहे. आताही भाजप आपल्यास मित्रपक्षांवर डाव टाकत असून आगामी आठ दिवसात राज्याच्या राजकारणात मोठा भूकंप बघायला मिळेल, असा मोठा दावा काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी केला आहे. नाना पटोले रविवारी (५ एप्रिल) नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी पटोले यांनी पाज राज्यांच्या निवडणूक निकालांपूर्वीच 'ऑपरेशन लोटस' पूर्णत्वास जाणार असल्याचा दावा केला आहे.*



अमरावतीच्या माजी खासदार नवनीत राणा यांनी मध्यंतरी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना आणि शिवसेना उद्धव ठाकरे ठाकरे, तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अनेक बडे नेते, आमदार आणि खासदार भाजपच्या संपर्कात असल्याचा दावा केला होता. याबाबत विचारलेल्या प्रश्नावर नाना पटोले यांनी मित्र पक्षांना संपवणे हा भाजपचा इतिहासच असल्याचे सांगितले. भाजप हा इतरांना गिळंकृत करणार पक्ष आहे. देशभरातील भाजपच्या मित्र पक्षांचे काय झाले यावर नजर टाकल्यास शिंदे सेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे फार काही भवितव्य दिसत नाही. त्यांचे नेते भाजपमध्ये सामील झाल्यास नवल वाटण्याचे कारण नाही. याची सुरुवात झाली आहे. असे झाल्यास राज्यात यापुढे भाजप आणि काँग्रेस हे दोनच पक्ष शिल्लक राहतील, असे नाना पटोले म्हणाले.

भाजप हा अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचा गेम करणार असल्याचे मी आधीच बोललो होतो. आणखी मोठा खेळ शिल्लक आहे. फक्त आठ दिवस थांबा हे तुम्हाला दिसेल. महाराष्ट्राची जनता भाजपच्या या खेळाला कंटाळली आहे. त्यांना पुन्हा सत्तेवर काँग्रेस हवी आहे. मात्र सरकारने बॅलेटवर मतदान घेतले तर जनता भाजपला त्यांची जागा दाखवून देली, असा दावाही नाना पटोले यांनी केला. यावेळी भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावर विचारले असता नाना पटोले म्हणाले, अशोक खरात हा सत्ताधाऱ्यांनीच पोसलेला बाबा असून त्याच्या आश्रमात बड्या नेत्यांची आणि अति महत्वाच्या व्यक्तींची ये-जा होती. यानंतर सरकार आणि गृहमंत्र्यांना त्याची माहिती नाही हे पटण्यासारखे नाही. सरकानेच त्याला पाठीशी घालते. आता हे प्रकरण अंगलट असल्यामुळे सरकारची कोंडी झाली आहे, असा आरोप नाना पटोले यांनी केला.

मॅरेज हॉलवर छापा, ८० तरुण-तरुणी आक्षेपार्ह स्थितीत सापडले

पाटणा: एका मंगल कार्यालयावर पोलिसांनी छापा टाकला. या ठिकाणी ८० तरुण-तरुणी आक्षेपार्ह स्थितीत पकडले गेले. पोलिसांनी कायदेशीर कारवाई सुरु केली आहे. पोलिसांच्या छाप्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. घटना बिहारच्या रोहतास जिल्ह्यातील दावथ पोलीस ठाण्यात घडली आहे.

मालियाबागमध्ये असलेल्या एका मंगल कार्यालयावर पोलिसांनी छापा टाकला. पोलिसांनी ३९ महिला आणि ४१ पुरुषांना आक्षेपार्ह स्थितीत पकडलं. या सगळ्यांना न्यायालयात हजर करण्यात आलं आहे. बिक्रमगंजचे एसडीएम प्रभात कुमार यांच्या तक्रारीनंतर दावथ पोलीस ठाण्यात एफआयआर नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी सगळ्या आरोपींविरोधात कायदेशीर कारवाई सुरु केली आहे.पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या ८० जणांपैकी ३१ अल्पवयीन आहेत. पैकी १८ मुली आणि १३ मुलं आहेत. अल्पवयीन मुलींच्या प्रकरणात पॉक्सो कायद्याच्या अंतर्गत तक्रार नोंदवण्यात आली आहे. छापा टाकण्यात आला त्यावेळी १३ अल्पवयीन मुलं सज्ञान महिलांसोबत आक्षेपार्ह स्थितीत सापडली. या प्रकरणांमध्ये विविध कलमांच्या अंतर्गत गुन्हे नोंदवण्यात आली आहे. पकडण्यात आलेल्या तरुण-तरुणींपैकी बहुतांश ग्रामीण भागांमध्ये राहणारे आहेत. यातील अनेक जणी शाळा आणि महाविद्यालयात शिकणाऱ्या आहेत.

अल्पवयीन तरुणींना वैद्यकीय तपासणीसाठी पाठवण्यात आलं. त्यानंतर अन्य कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यावर त्यांना बाल कल्याण समितीकडे सोपवण्यात आलं.

इराणमधून USच्या पायलटची थरारक सुटका

मिशन पूर्ण होताच अमेरिकेनं आपलीच २ विमानं स्फोटांनी उडवली

तेहरान: इराणमध्ये अडकलेल्या एफ-१५ ई विमानाच्या पायलटच्या सुटकेसाठी अमेरिकन सैन्यानं इतिहासातील सर्वात धोकादायक ऑपरेशन हाती घेतलं. या मोहिमेदरम्यान अमेरिकेच्या स्पेशल फोर्सेसचे कमांडो आणि इराणी सैन्यात थेट संघर्ष झाला. या धाडसी मोहिमेत अमेरिकन सैन्याला आपलीच दोन विमानं स्फोट घडवून उडवून द्यावी लागली. ऑपरेशनच्या अखेरच्या टप्प्यात अमेरिकन कमांडोंनी हा धाडसी निर्णय घेतला.

अमेरिकेचा बेपत्ता पायलट इराणच्या सुदूर भागातील एका घरात लपला होता. इराणी सैन्यानं त्याला शोधण्यासाठी जंग जंग पछाडलं. पण तो पायलट इराणी सैन्याच्या हाती लागण्याआधी अमेरिकन सैन्यानं त्याची सुरक्षित सुटका केली. पायलटची



सुटका करण्यासाठी १०० कमांडो, डझनभर विमानं, हेलिकॉप्टर्स विशेष मोहिमेत सहभागी झाली होती. त्यांचा थेट सामना इस्लामिक रिव्होल्युशरी गार्ड कॉर्पशी झाला.

अमेरिकन सैन्यातील स्पेशल फोर्सेसला बेपत्ता झालेल्या पायलटचा ठावठिकाणा समजताच त्यांनी सुदूर परिसराकडे कूच केलं. याच सुमारास इराणी सैन्यदेखील त्याच भागाकडे निघालं. त्यांनी अमेरिकन सैन्यावर बेछूट गोळीबार सुरु केला. प्रत्युत्तरादाखल अमेरिकन सैन्यानं इराणी सैन्याच्या ताफ्यावर बॉम्ब वर्षाव केला. इराणी सैन्य बेपत्ता पायलटपर्यंत पोहोचू नये याची पूर्ण खबरदारी अमेरिकेच्या कमांडोंनी घेतली.

पायलटच्या सुटकेसाठी अमेरिकन राबवलेलं ऑपरेशन अखेरच्या क्षणी धोक्यात सापडलं. या ऑपरेशनमध्ये सहभागी असलेल्या अमेरिकेची दोन विमानं अचानक संकटात सापडली. यामध्ये महाकाय सी-१३० हर्क्युलिसचाही समावेश होता. या विमानाचा वापर सैनिकांच्या वाहतुकीसाठी केला जातो. बचाव पथकातील कमांडोंना घेऊन अमेरिकेची विमानं इराणमधील एका रिमोट बेसवर उतरली.

सुनेत्रा पवार आज अर्ज दाखल करणार



तभा वृत्तसेवा

मुंबई, दि. ०५ एप्रिल उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार सोमवारी (६ एप्रिल) बारामती विधानसभेच्या पोटनिवडणूकीसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक जाहीर झाली असून सोमवार ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी अजित पवार यांच्या जागेवर निवडणूक लढविण्याचा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने घेतला आहे. त्यानुसार सुनेत्रा पवार सोमवारी अर्ज दाखल करणार आहेत. राष्ट्रवादीचे बहुसंख्य मंत्री, आमदार, पदाधिकारी, पवार कुटुंबिय या प्रसंगी उपस्थित असतील.

पवार कुटुंबियांच्या परंपरेनुसार सकाळी श्री क्षेत्र कऱ्हेरी येथील मारुतरायाचे दर्शन घेत त्या विद्या प्रतिष्ठानवरील अजित पवार यांच्या स्मृतीस्थळी वंदन करण्यासाठी जाणार आहेत.

विद्यापीठाच्य प्रशासकीय सुधारणा करण्याचे शासनाचे 'व्हिजन': मंत्री चंद्रकांतदादा पाटील

तभा वृत्तसेवा

मुंबई, दि. ०५ एप्रिल राज्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आणि त्यांना देश-विदेशातील उच्च शिक्षणाच्या संधी वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन ठोस उपाययोजना करत आहे.. विशेषतः लोणेरे (जि. रायगड) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाअंतर्गत महाविद्यालयांच्या परीक्षा आणि निकाल प्रक्रियेतील अडचणी दूर करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी ठोस पावले उचलली आहेत.

बाटु विद्यापीठाकडून परीक्षांचे वेळापत्रक आणि गुणपत्रिका तसेच पदवी प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होत असल्याच्या तक्रारी विद्यार्थी,संस्थाचालक आणि लोकप्रतिनिधींकडून मोठ्या प्रमाणावर प्राप्त झाल्या आहेत. तसेच या सर्व कोलमडलेल्या वेळापत्रकामुळे अनेक महाविद्यालये व संस्थाचालकांनी विद्यापीठापासून विसंलग्निकरणाचीही मागणी केली आहे. या सर्व शैक्षणिक बाबींची विचार करून प्रशासकीय अडचणी दूर करण्यासाठी कालबद्ध



आराखडा तयार करण्याचे निर्देश देऊन परीक्षा आणि निकाल प्रक्रिया आता 'मिशन मोड'वर मार्गी लावण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

नव्या नेतृत्वावर मोठी जबाबदारी परीक्षा सुधारणांचा दांडगा अनुभव असलेल्या प्रभारी कुलगुरूंची नियुक्ती विद्यापीठात करण्यात आली आहे. राजेश अग्रवाल समितीसह विविध शासकीय समित्यांवर काम केलेले आहे.या अनुभवातून प्रभारी कुलगुरूंनी पुढील ३ ते ६ महिन्यांत सर्व प्रलंबित प्रश्न मार्गी लावावे आणि विद्यार्थी हिताला सर्वोच्च प्राधान्य द्यावे असे निर्देश मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी दिले आहेत.

विद्यापीठाच्य प्रशासकीय सुधारणा करण्याचे शासनाचे 'व्हिजन'

निकाल प्रक्रिया कालबद्ध करण्यासाठीपरीक्षा वेळेत घेऊन निकाल विहित मुदतीत जाहीर करण्याला सर्वोच्च प्राधान्य एआय सक्षम महाविद्यालये : विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये कृत्रिम बुद्धिमत्तेने सज्ज करण्याची योजना तयार करण्यात आली आहे. सेंटर्स ऑफ एक्सलन्स : सार्वजनिक-खासगी भागीदारी (PPP) मॉडेलद्वारे उत्कृष्टता केंद्रे उभारली जातील. यासाठी CSR निधी आणि शासकीय अनुदानातून तरतूद केली जाणार आहे.तसेच प्रभारी कुलगुरूंना परीक्षा आणि निकाल प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी स्पष्ट आणि कडक सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांचे हित राज्य शासनाचे सर्वोपरी असून, शैक्षणिक नियोजन सुस्थितीत आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत. परीक्षा व निकाल प्रक्रिया सुरळीत सुरू झाली की विसंलग्निकरणाचा प्रश्नच उद्भवणार नाही, असेही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी यावेळी सांगितले.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

उन्हाळी सुट्यांसाठी छत्रपती संभाजीनगरमधून एसटीच्या रोज 31 जादा बस रस्त्यावर

छत्रपती संभाजीनगर | उन्हाळी सुट्टयांच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता एसटी महामंडळाने १५ एप्रिलपासून दररोज ३१ जादा बसेस सोडण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे पुणे, नाशिक आणि मुंबई मार्गावरील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या निर्णयामुळे दररोज एसटीबसच्या ८९ अतिरिक्त फेऱ्या होणार असून सुमारे १३ हजार किमीचा प्रवास वाढणार आहे, सध्या शहरातून ५४६ बसेस धावत असून जादा बसेसमुळे प्रवाशांची गैरसोय टळणार आहे.

उन्हाळी सुट्टयांमुळे नियमित रेल्वे गाड्यांचे आरक्षण महिनाभर आधीच 'वेटिंग'वर गेल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. ही गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने 'नांदेड - हजरत निजामुद्दीन (दिल्ली)' दरम्यान साप्ताहिक उन्हाळी विशेष रेल्वे चालवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार नांदेड-हजरत निजामुद्दीन (०७६२१) ही विशेष रेल्वे ११ एप्रिल ते ३० मे दरम्यान दर शनिवारी सकाळी ८:४५ वाजता नांदेडहून सुटेल. ही गाडी छत्रपती संभाजीनगरला दुपारी १२:५५ वाजता येईल. परतीच्या प्रवासात (०७६२२) हजरत निजामुद्दीन येथून १२ एप्रिल ते ३१ मे या काळात दर रविवारी रात्री ९:४० वाजता सुटेल. या रेल्वेला एसी, स्लीपर आणि जनरल डबे असतील. ही गाडी पूर्णा, परभणी, जालना, मनमाड, भुसावळ, भोपाळ आणि झाशी या प्रमुख स्थानकांवर थांबेल. या विशेष रेल्वेचे आरक्षण ५ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजेपासून सुरू होत आहे. यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

शेतकऱ्यांच्या परिश्रमाची, कर्मचाऱ्यांच्या समर्पणाची आणि सहकार मूल्यांची विजयगाथा : दिलीप संघानी

तभा. वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर | इंडियन फार्मर्स फर्टिलिझर्स को ऑपरेटिव्ह लिमिटेड ने २०२५–२६ आर्थिक वर्षात ४,१०६ कोटी रुपयांपेक्षा अधिक करपूर्व नफा नोंदवत सहकार क्षेत्रात महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. दिलीप संघानी यांनी या यशाला केवळ आर्थिक उपलब्धी नसून शेतकरी, कर्मचारी आणि सहकार चळवळीच्या मूल्यांची एकत्रित विजयगाथा असे वर्णन केले.

१९६७ मध्ये ५७ सहकारी संस्थांपासून सुरू झालेली IFFCO आज ३६ हजारांहून अधिक संस्थांपर्यंत विस्तारली असून लाखो शेतकऱ्यांशी



जोडली गेली आहे. चालू वर्षात संस्थेने ११८.७५ लाख मेट्रिक टन खतांची विक्री आणि ११९.६८ लाख मेट्रिक टन खतांचा पुरवठा करत नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

नॅनो खतांच्या क्षेत्रातही IFFCOने उल्लेखनीय प्रगती केली असून ३०.१ लाखांहून अधिक बाटल्यांची विक्री झाली आहे. नॅनो युरिया प्लस व नॅनो डीएपी ही उत्पादने पर्यावरणपूरक आणि किफायतशीर पर्याय म्हणून लोकप्रिय ठरत आहेत. बेंगळुरू येथील नव्या प्रकल्पामुळे उत्पादन क्षमतेत वाढ झाली आहे.

कर्मचारी कल्याणासाठी १ नोव्हेंबर २०२५ पासून कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान ₹२०,००० वेतन लागू करण्यात आले आहे. या यशासाठी नरेंद्र मोदी, अमित शहा, जेपी नड्डा आणि शिवराज सिंग चव्हाण यांच्या मार्गदर्शनाबद्दल संघानी यांनी कृतज्ञता व्यक्त केली. "विकसित भारत@२०४७"च्या दिशेने नॅनो तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कृषी क्षेत्र बळकट करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

शहरातील फळ, भाजी विक्रेत्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर 9 एप्रिलला बैठक

छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर शहरातील फळ आणि भाजीपाला विक्रेत्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर

आणि त्यांच्या पुनर्वसनाबाबत सामंजस्याने तोडगा काढण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या प्रकरणातील गुंतागुंत सोडवण्यासाठी महापालिका आयुक्त, संबंधित विकासक आणि याचिकाकर्ते युनियनचे प्रतिनिधी यांची ९ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता मनपा आयुक्तांच्या शिंदे यांनी दिले आहेत. जिल्हा फळ व भाजीपाला विक्रेता युनियनने २०१२ मध्ये दाखल केलेल्या जनहित याचिकेच्या अनुषंगाने दाखल अवमान याचिकेवर गुरुवारी सुनावणी झाली. दोन्ही बाजूंच्या वकिलांनी मांडलेल्या तोंडी प्रस्तावानुसार, वादाचे मुद्दे सामंजस्याने सोडवण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात येणार आहे. ९ एप्रिलच्या बैठकीत होणाऱ्या चर्चेचा सकारात्मक निष्कर्ष न्यायालयासमोर ठेवावा लागणार आहे.

असे आहे मूळ प्रकरण औरंगाबाद जिल्हा फळ व भाजीपाला विक्रेता युनियन यांचे मार्फत उच्च न्यायालयात २०१३ मध्ये याचिका दाखल करण्यात आली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजेला औरंगपुरा भाजी मंडई पाडण्यात येणार होती. त्यामुळे सदर प्रकरणात खंडपीठाने ऐतिहासिक निर्णय देऊन रात्री साडेनऊ वाजेला अंतरिम आदेश पारित केले होते. औरंगपुरा येथील भाजी मंडई रिकामी करून त्या ठिकाणी मोठी इमारत बांधण्यात आली. १५० भाजी विक्रेत्यांना १८ महिन्यात त्यांना नवीन इमारतीमध्ये स्थलांतरित करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र अजूनही भाजी विक्रेत्यांना नवीन इमारतीमध्ये स्थलांतरित केलेले नाही. २०१५ मध्ये अवमान याचिका दाखल झाली होती.

तूळजापूर गोदावरी पात्रात बेसुमार अवैध वाळू उपसा



तभा. वृत्तसेवा

पैठण दि ०५ | पैठण तालुक्यातील नवगांव तुळजापूर गोदावरी पात्रात वाळू तस्करांनी अक्षरशः हैदोस घातला असून याठिकाणी रात्रंदिवस शेकडो वहानंद्वारे बेसुमार वाळूचा ओरबाडा सुरु आहे. महसूल तसेच पोलीस प्रशासनाने अवैध वाळू चोरी बंद करून वाळूतस्करांचा बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

पैठण परिसरात अवैध वाळू उत्खनन थांबता थांबत नसून गणथडी भागातील नवगांव, तुळजापूर,आवडे उंचेगाव, टाकळी अंबड, वडवाळी कट भागात गोदावरी पात्रातून शेकडो यारी यंत्र, हायवा ट्रक, लोडर, जेसीबी वाहनांद्वारे बेसुमार वाळू उपसा सुरु आहे. या वाळू तस्करांनी दमदाटी करत अनेक शेतकऱ्यांच्या शेतातून वाळू वाहतूक मार्ग तयार केला असून यामुळे दररोज शेतकरी आणि वाळू तस्करांमध्ये वाद होत आहे.स्थानिक गांवगुंडांच्या दबावाखाली हा सर्व प्रकार सुरु असल्याचे बोलले जात आहे. पैठण महसूल प्रशासनान तसेच पोलीस प्रशासनाने होणारी अवैध वाळू वाहतूक बंद करून वाळू तस्करांवर कडक कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

टेक्नो स्पार्क 50 5जी आजपासून विक्रीसाठी उपलब्ध

मुंबई- टेक्नो स्पार्क ५० ५जी आजपासून भारतात विक्रीसाठी उपलब्ध झाला आहे. 4जीबी + 128जीबी व्हेरिएंटची किंमत ₹16,999 असून 6जीबी + 128जीबी मॉडेल ₹18,999 मध्ये उपलब्ध आहे. हा स्मार्टफोन फ्लिपकार्ट तसेच देशभरातील रिटेल स्टोअर्समध्ये त्वरित खरेदी करता येतो. याशिवाय 8 महिन्यांपर्यंत नो-कॉस्ट ईएमआई पर्यायही उपलब्ध आहे.

टेक्नो स्पार्क ५० ५जी हा सतत चार्जर शोधण्याच्या त्रासाला कंटाळलेल्या वापरकर्त्यांसाठी खास बनवला आहे. यामध्ये 6500एमएएच ची मोठी बॅटरी देण्यात आली आहे, जी दिवसभर जोरदार वापरातही टिकते. तसेच मिलिटरी-ग्रेड ड्रॉप प्रोटेक्शन आणि स्प्लॅश व डस्ट रेटिंगमुळे हा फोन पडणे किंवा अचानक पावसात भिजणे अशा परिस्थितीतही सुरक्षित राहतो.

आ. अब्दुल सत्तार यांची सोयगाव शिवारात नुकसानग्रस्त भागाची प्रत्यक्ष पाहणी

तभा. वृत्तसेवा

तालुक्यातील सोयगाव शिवारात अलीकडे झालेल्या वादळी वाऱ्यासह गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.या पार्श्वभूमीवर आमदार अब्दुल सत्तार यांनी सोयगाव शिवारात नुकसानग्रस्त भागाची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. या वेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.वादळीवारा व गारपिटीमुळे उभ्या पिकांचे तसेच फळबाग पाल्या भाज्यांचे नुकसान झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. मका,बाजरी,ज्वारी यासारखे पिके आडवी पडली असून उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. पाहणी दरम्यान आमदार अब्दुल सत्तार यांनी तहसीलदार तसेच कृषी अधिकाऱ्यांना तात्काळ नुकसानग्रस्त भागाचा पंचनामा करण्याच्या सूचना दिल्या. "शेतकऱ्यांचे नुकसान अचूक नोंदवून त्वरित शासनाकडे अहवाल सादर करावा,जेणेकरून मदत लवकर मिळू शकेल,"असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.



मदत मिळवून देण्यासाठी आपण पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी शेतकऱ्यांना आश्वासन दिले.नैसर्गिक आपत्तीमुळे आधीच अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना या संकटातून सावरण्यासाठी प्रशासनाने तत्परतेने काम करावे,असेही त्यांनी नमूद केले. याप्रसंगी शिवसेना उपजिल्हा प्रमुख प्रभाकर (आबा)काळे,माजी जिल्हा परिषद सदस्य तसेच,शासनाकडून योग्य ती आर्थिक गोपीचंद जाधव,नगरसेवक तथा सोयगाव शिवसेना शहरप्रमुख संतोष बोडखे,उस्मान पठाण,गटनेते अक्षय काळे,युवानेते कुणाल राजपूत,तालुका कृषी अधिकारी कासार,विशाल चव्हाण,हर्षल काळे,कदीर शहा,श्रावण चव्हाण,किशोर मापारी,संदीप सुरडकर,दीपक पगारे,शेख रऊफ,फिरोज पठाण,मोतीराम पंडित,जितेंद्र चौधरी,रंगनाथ वराडे, समाधान काळे आदींची उपस्थिती होती.

एमजीएममध्ये कौशल्य प्रदर्शन यशस्वीपणे संपन्न

आंतरवासिता कार्यकाळात शिकलेल्या कौशल्यांचे विद्यार्थ्यांनी केले सादरीकरण

तभा. वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर, दि.४ | महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयात चालू शैक्षणिक वर्षातील अंतिम वर्ष अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या आंतरवासिता काळामध्ये आत्मसात केलेली कौशल्ये आणि व्यावसायिकता यावर आधारीत पोस्टर प्रेझेंटेशन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आज संपन्न झाले.

या उद्घाटन सोहळ्यास एमजीएम विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, प्राचार्या डॉ. विजया मुसांडे, ह्योसँग कंपनीचे अनिल पवार, प्रेसिसियन पॉवर प्रॉडक्टचे नितीन कुटे, फिनार्कीनतर्फे प्रणव भोगे, ट्रेनिंग आणि प्लेसमेंटचे प्रमुख प्रा.श्रीकृष्ण पवार, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित



होते.

या प्रदर्शनात महाविद्यालयाच्या प्रत्येक विभागातून निवडक विद्यार्थ्यांनी आपली कौशल्ये सादर केली. उर्वरीत विद्यार्थ्यांचे सादरीकरण संबंधित अभियांत्रिकी विभागात परिक्षकांसमोर घेण्यात येऊन त्यांच्या सादरीकरणाचे परिक्षण करण्यात आले.

या पोस्टर प्रदर्शन स्पर्धेत गौरवी शिंदे हिने प्रथम क्रमांक, शशांक भट याने द्वितीय क्रमांक तर भक्ती भोईटे हिने तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्यांना स्मृतीचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. योगेश बारोकर, डॉ. विनोद अग्रवाल, संजना पटनी, देवेंद्र इराळे, तेजल पाटील, परम नाहाटा, प्लेसमेंट विभागातील आरती राऊलवार आणि महेश काटे यांनी प्रयत्न केले.

नव्या शैक्षणिक धोरणानुसार अभियांत्रिकी शिक्षणात कौशल्य शिक्षण व व्यावसायिकतेला महत्व आलेले असून सदर कौशल्ये विकसित करण्यासाठी अभियांत्रिकी शिक्षणाच्या अंतिम वर्षातील अंतिम सत्रात पूर्ण सहा महिने विद्यार्थी इंटर्नशिप कार्यक्रमांतर्गत विविध औद्योगिक समुहात कार्य करतात. नवनवीन व्यवसायिक कौशल्ये, कार्यशैली, व्यावसायिक संभाषण व वातावरण अनुकरण या सर्वांना आत्मसात करण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांचा असतो. ज्यामुळे शिक्षणानंतर त्यांना सहजतेने रोजगारक्षम बनवता येते तसेच उद्योग क्षेत्राला सुद्धा दर्जेदार अभियंते मिळतात.

जितेन्द्र पापलकर यांना जीसा Engineering Excellence Award ने सन्मानित

तभा. वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर | जैन इंजिनियर्स सोसायटी जीसा छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मा. श्री जितेन्द्र पापलकर (विभागीय आयुक्त) यांना जीसा Engineering Excellence Award प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रशासनिक व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रदान करण्यात येतो.

या प्रसंगी जीसा चे अध्यक्ष प्रद्युम्न शहा यांनी आपल्या संक्षिप्त मनोगतात पापलकर यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या योगदानाला प्रेरणादायी असल्याचे सांगितले. पापलकर यांनी जीसा चे आभार मानून संस्थेच्या कार्याचे कौतुक केले.



कार्यक्रमात नारी शक्ती अंतर्गत महिलांचा सन्मान करण्यात आला. या उपक्रमाचे प्रोजेक्ट हेड म्हणून सौ. रश्मी गांधी यांनी नेतृत्व केले, तर करा ओके नाईट या उपक्रमाचे नेतृत्व इंजि. सुशील गंगवाल यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप उत्साहपूर्ण झाला. शेवटी सचिव मयूर पाटनी यांनी आभार प्रदर्शन केले.

नगर परिषद भोकरदन जि.जालना

निविदा सूचना वर्ष 2026-27 जा.क्र./वि.का.वि./नपभो/2026/0615 दिनांक 02.04.2026 **नगर परिषद सर्व साधारण निधी सन 2026-27**

मुख्याधिकारी,नगर परिषद भोकरदन जि.जालना यांच्याव्दारे खालील कामाच्या दोन लिफाफा पध्दतीने सिलबंद पाकीटात निविदा सा.बां.विभागाकडे/ म.जी.प्रा.कडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी कंत्राटदाराकडून ऑफलाईन निविदा प्रणालीव्दारे निविदा मागविण्यात येत आहे. **(महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.९८/नवि-१६ दिनांक ०८.०७.२०२१.)**

अ. क्र.	कामाचे नांव	अंदाजपत्रकीय रक्कम	बयाणा रक्कम	निविदा फॉर्म फी	कामाचा कालावधी
1	भोकरदन शहर पाणी पुरवठा योजनेच्या (अस्तित्वातील) मौजे दानापूर येथील जुई मध्यम प्रकल्पावरील उद्भव स्त्रोतवरील पंप हाऊस वरील पंपीग मशीनरी व इत्तर अनुषंगिक यांत्रिकी व विद्युत उपांगाची दुरुस्ती करणे.	10,00,000.00	10,000.00	590.00	12 महिने
2.	भोकरदन शहर पाणी पुरवठा योजनेच्या (अस्तित्वातील) मौजे आलापूर येथील जलशुध्दिकरण केंद्रावरील पंपीग मशीनरी व इत्तर अनुषंगिक यांत्रिकी व विद्युत उपांगाची दुरुस्ती करणे.	10,00,000.00	10,000.00	590.00	12 महिने
3.	भोकरदन शहर पाणी पुरवठा योजनेच्या (अस्तित्वातील) मौजे दानापूर येथील जुई मध्यम प्रकल्पावरील उद्भव स्त्रोतवरील पंप हाऊस पासून मौजे आलापूर येथील जलशुध्दिकरण केंद्रापर्यंत 300 mm.A.C.Class IV अशुध्द पाण्याची उर्ध्ववाहिनी ची गळती दुरुस्ती करणे.**(महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन २०२३-२४ च्या दरसूची नुसार)**	10,00,000.00	10,000.00	590.00	12 महिने
4.	भोकरदन शहर पाणी पुरवठा योजनेच्या (अस्तित्वातील) मौजे आलापूर येथील शुध्द पिण्याचे पाण्याचे संप पासून ते शहरातील विविध टाक्यांपर्यंत च्या 300 mm.A.C.Class IV अशुध्द पाण्याची उर्ध्ववाहिनी ची गळती दुरुस्ती करणे.**(महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन २०२३-२४ च्या दरसूची नुसार)**	10,00,000.00	10,000.00	590.00	12 महिने
5.	भोकरदन शहर पाणी पुरवठा योजनेच्या (अस्तित्वातील) मौजे दानापूर येथील जुई मध्यम प्रकल्पावरील उद्भव स्त्रोतवरील पंप हाऊस व मौजे आलापूर येथील जलशुध्दिकरण केंद्रावरील सब स्टेशन,11 kv एक्सप्रेस फीडर,अनुक्रमे १०० Kva व 62 Kva रोहित्र व इत्तर अनुषंगिक दुरुस्ती करणे. **(सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत विभाग) च्या सन 2022-23 च्या दरसूची नुसार)**	10,00,000.00	10,000.00	590.00	12 महिने
6.	भोकरदन शहर पाणी पुरवठा योजनेच्या (अस्तित्वातील) मौजे दानापूर येथील जुई मध्यम प्रकल्पावरील उद्भव स्त्रोतवरील पंप हाऊस व मौजे आलापूर येथील जलशुध्दिकरण केंद्रावर पाणी शुध्दिकरण प्रक्रियासाठी कंत्राटी पध्दतीने मजूर पुरवठा करणे. **(महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन २०२३-२४ च्या दरसूची नुसार)**	10,00,000.00	10,000.00	590.00	12 महिने
7.	भोकरदन शहर पाणी पुरवठा योजनेच्या (अस्तित्वातील) वितरण व्यवस्था मध्ये विविध प्रभागात विविध ठिकाणी नवीन विविध आकाराची शुध्द पिण्याचे पाण्याची गुरुत्व वाहिनी,व्हॉल्व्ह व अनुषंगिक साहित्य व गळती दुरुस्ती करणे. **(महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन २०२३-२४ च्या दरसूची नुसार)**	10,00,000.00	10,000.00	590.00	12 महिने
8.	भोकरदन शहर पाणी पुरवठा योजनेच्या (अस्तित्वातील) वितरण व्यवस्था मध्ये शुध्द पिण्याचे उभारण्यात आलेल्या टाक्यांवरुन पाणी वितरण साठी कंत्राटी पध्दतीने मजूर पुरवठा करणे.**(महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन २०२३-२४ च्या दरसूची नुसार)**	10,00,000.00	10,000.00	590.00	12 महिने
9.	भोकरदन शहर पाणी पुरवठा योजनेच्या (अस्तित्वातील) जलशुध्दिकरण केंद्रावर पाण्याची शुध्दिकरण प्रक्रियेत अॅलम ग्रेड-1 पुरवठा करणे. **(महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन २०२३-२४ च्या दरसूची नुसार)**	10,00,000.00	10,000.00	590.00	12 महिने
10.	भोकरदन शहर पाणी पुरवठा योजनेच्या (अस्तित्वातील) जलशुध्दिकरण केंद्रावर पाण्याची शुध्दिकरण प्रक्रियेत ब्लिचिंग पावडर बैग पुरवठा करणे. **(महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन २०२३-२४ च्या दरसूची नुसार)**	10,00,000.00	10,000.00	590.00	12 महिने
11.	भोकरदन शहर पाणी पुरवठा योजनेच्या (अस्तित्वातील) मुख्य उर्ध्ववाहिनी व वितरण व्यवस्था मधील विविध आकाराचे व्हॉल्व्ह ची दुरुस्ती व व्हॉल्व्ह चे चेंबर बांधकाम करणे.	5,00,000.00	5,000.00	236.00	12 महिने
12.	भोकरदन शहरात विविध प्रभागात विविध ठिकाणी आर.सी.सी.Pre Cast ढापे तयार करणे. **(सार्वजनिक बांधकाम विभाग च्या सन 2022-23 च्या दरसूची नुसार)**	10,00,000.00	10,000.00	590.00	12 महिने
13.	भोकरदन शहरात श्री गणपती मिरवणूक मार्ग,अस्तित्वातील खड्डे बुजविण्यासाठी तसेच अडथळा मुक्त रहदारी व वाहतुकीसाठी विविध प्रभागात विविध ठिकाणी मुरुम टाकणे. **(सार्वजनिक बांधकाम विभाग च्या सन 2022-23 च्या दरसूची नुसार)**	10,00,000.00	10,000.00	590.00	12 महिने
14.	भोकरदन शहरात डेंग्यू प्रतिबंधात्मक कारवाई साठी शहरातील विविध प्रभागात विविध ठिकाणी फोगिंग मशीन,रसायन सह धूर फवारणी करणे.	10,00,000.00	10,000.00	590.00	12 महिने
15.	भोकरदन नगर परिषद हद्दीतील शहरातील विविध प्रभागातील विविध ठिकाणच्या अस्तित्वातील हातपंपाच्या दुरुस्ती साठी साहित्य व मनुष्यबळासह दुरुस्ती काम करणे.	10,00,000.00	10,000.00	590.00	12 महिने
16.	भोकरदन नगर परिषद अंतर्गत शहरातील विविध प्रभागातील विविध ठिकाणी अस्तित्वातील पोल वरील पथदिव्यांसाठी आवश्यक विद्युत साहित्य व इतर अनुषंगिक साहित्य पुरवठा करणे.	10,00,000.00	10,000.00	590.00	12 महिने
17.	भोकरदन नगर परिषद विद्युत विभागांतर्गत शहरातील पथदिव्यांची देखभाल-दुरुस्ती साठी कंत्राटी पध्दतीने कुशल व अकुशल मजूर पुरवठा करणे. **(महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन २०२३-२४ च्या दरसूची नुसार)**	10,00,000.00	10,000.00	590.00	12 महिने
18.	भोकरदन नगर परिषद सार्वजनिक बांधकाम विभाग/विकास कामे कक्षात कंत्राटी पध्दतीने कुशल व अकुशल मजूर पुरवठा करणे.**(महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन २०२३-२४ च्या दरसूची नुसार)**	10,00,000.00	10,000.00	590.00	12 महिने
19.	भोकरदन नगर परिषद अंतर्गत मुस्लिम कब्रस्तान मध्ये विविध ठिकाणी हायमास्क बसविणे. **(सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत विभाग) च्या सन 2022-23 च्या दरसूची नुसार)**	10,00,000.00	10,000.00	590.00	12 महिने
20.	भोकरदन नगर परिषद अंतर्गत शहरातील विविध ठिकाणी हायमास्क दुरुस्ती करणे. **(सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत विभाग) च्या सन 2022-23 च्या दरसूची नुसार)**	5,00,000.00	5,000.00	236.00	12 महिने

निविदा पध्दतीचा तपशील व वेळापत्रक

अ.क्र.	विवरण	दिनांक	वेळ
1.	**प्रसिध्दी दिनांक**	०६.०४.२०२६	सकाळी ११:०० वाजता
2.	दस्तावेज विक्री दिनांक	०६.०४.२०२६	सकाळी ११:०० वाजता
3.	**दस्तावेज विक्री अंतिम दिनांक**	१३.०४.२०२६	सांय ०४:०० वाजता
4.	निविदा सादर दिनांक	०६.०४.२०२६	सकाळी ११:०० वाजता
5.	**निविदा सादर करावयाचे अंतिम दिनांक**	१३.०४.२०२६	सांय ०४:००वाजता
6.	**तांत्रिक बोलीचा लिफाफा उघडण्याची तारीख**	१५.०४.२०२६	सकाळी ११:०० वाजता

स्वाक्षरीत/- (गोवर्धन सोनवणे) विद्युत विभाग प्रमुख नगर परिषद भोकरदन

स्वाक्षरीत/- (अजय व्यवहारे) नगर अभियंता नगर परिषद भोकरदन

स्वाक्षरीत/- (ज्ञानेश्वर रेवगडे) लेखापाल नगर परिषद भोकरद

स्वाक्षरीत/- (गजानन तायडे) मुख्याधिकारी नगर परिषद भोकरदन

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

संक्षिप्त वृत्त...

हुजूर साहिब नांदेड - हजरत निजामुद्दीन -हुजूर साहिब नांदेड दरम्यान साप्ताहिक उन्हाळी विशेष गाडीच्या १६ फेऱ्या

परभणी,/प्रतिनिधी : उन्हाळी हंगामात प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन हुजूर साहिब नांदेड - हजरत निजामुद्दीन -हुजूर साहिब नांदेड दरम्यान १६ साप्ताहिक उन्हाळी विशेष गाड्या चालविण्यात येणार आहेत, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क विभागाने दिली.

गाडी क्र. ०७६२१ हुजूर साहिब नांदेड - हजरत निजामुद्दीन साप्ताहिक विशेष ही गाडी ११ एप्रिल २०२६ ते ३० मे २०२६ दरम्यान प्रत्येक शनिवारी हुजूर साहिब नांदेड येथून सकाळी ०८:४५ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १४:०० वाजता हजरत निजामुद्दीन येथे पोहोचेल. या कालावधीत एकूण ०८ फेऱ्या चालविण्यात येतील. हि गाडी हुजूर साहिब नांदेड येथून दिनांक ११, १८, २५ एप्रिल आणि ०२, ०९, १६, २३ आणि ३० मे २०२६ रोजी धावेल. गाडी क्र. ०७६२१ हुजूर साहिब नांदेड - हजरत निजामुद्दीन साप्ताहिक विशेष गाडीचे आरक्षण दिनांक ५ एप्रिल रोजी सकाळी ०८:०० वाजता सुरु होईल.

परतीच्या दिशेने गाडी क्र. ०७६२२ हजरत निजामुद्दीन - हुजूर साहिब नांदेड साप्ताहिक विशेष ही गाडी १२ एप्रिल २०२६ ते ३१ मे २०२६ दरम्यान प्रत्येक रविवारी हजरत निजामुद्दीन येथून रात्री २१:४० वाजता सुटेल आणि तिसऱ्या दिवशी रात्री ००:३५ वाजता हुजूर साहिब नांदेड येथे पोहोचेल. या गाडीच्या देखील ०८ फेऱ्या चालविण्यात येणार आहेत. हि गाडी हजरत निजामुद्दीन येथून दिनांक १२, १९, २६ एप्रिल आणि ०३, १०, १७, २४ आणि ३१ मे २०२६ रोजी धावेल.

या विशेष गाड्या पूर्णा, परभणी, सेलू, परतूर, जालना, छत्रपती संभाजीनगर, मनमाड, जळगाव, भुसावळ, खंडवा, इटारसी, भोपाळ, बीना, झांसी, ग्वाल्हेर, आग्रा कॅन्ट आणि मथुरा या स्थानकांवर दोन्ही दिशांनी थांबतील. या गाड्यांमध्ये २-सी, ३-सी, स्लीपर आणि जनरल सेकंड क्लास कोचेस असतील, ज्यामुळे उन्हाळ्यातील प्रवाशांच्या सोयीसाठी अतिरिक्त प्रवास सुविधा उपलब्ध होणार आहे, असेही म्हटले.

दुःख निवृत्ती म्हणजे सुख नाही : हभप सद्गुरु चैतन्य महाराज देगलूरकर : वसंत व्याख्यानमालेतील सातव्या वर्षातील दुसरे पुष्प गुंफले

सेलू,दि.०४(प्रतिनिधी) : माणसाच्या जीवनात जे दुःख प्राप्त झालेले असते, त्याची निवृत्ती झाली की आपण त्याला सुख म्हणतो; मात्र केवळ दुःखाचा अभाव म्हणजे खरे सुख नव्हे, असे स्पष्ट प्रतिपादन हभप सद्गुरु चैतन्य महाराज देगलूरकर यांनी केले.

सेलू येथे साई मंदिर सभागृहात आयोजित वसंत व्याख्यानमालेच्या सातव्या वर्षातील दुसऱ्या पुष्पगुंतन कार्यक्रमात सद्गुरु चैतन्य महाराज देगलूरकर यांनी आशीर्वचनपर मार्गदर्शन करताना मानवी जीवनातील सुख आणि दुःखाच्या संकल्पनेवर अत्यंत सखोल व विचारप्रवर्तक विवेचन केले. पसायदानातील 'किंबहुना सर्व सुखी, पूर्ण होऊनी तीहीं लोकी' या ओवीचे विस्तृत स्पष्टीकरण देताना त्यांनी सांगितले की, भूक लागल्यावर अन्न मिळणे, तहान लागल्यावर पाणी मिळणे किंवा थंडीमध्ये उबदार कपडे मिळणे - हे खरे सुख नसून त्या त्या क्षणी झालेल्या दुःखाची निवृत्ती आहे. परंतु माणूस या निवृत्तीमध्येच सुख मानू लागतो आणि याच मर्यादित विचारात अडकून राहतो.

महाराजांनी उदाहरणादाखल सांगितले की, वेगवेगळ्या आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना त्यांच्या स्वतःच्या वेदना सर्वात मोठ्या वाटतात. याचे कारण म्हणजे माणूस आपल्या समोर असलेल्या दुःखाच्या पलीकडे विचार करत नाही. त्यामुळे तो व्यापक सुखाची कल्पनाच करू शकत नाही. वेदांनी दुःख ही संकल्पना स्वीकारलेली नाही, तर आनंद हीच खरी संकल्पना मान्य केली आहे, असे सांगत त्यांनी शोक, भीती, क्रोध यांसारख्या विकारांपासून मुक्त होणे म्हणजे शांती असली तरी ते अंतिम सुख नाही, असे स्पष्ट केले. सूर्य आणि ढग यांचा दृष्टांत देताना त्यांनी सांगितले की, सूर्य सतत प्रकाश देत असतो; परंतु ढग आल्यामुळे तो आपल्याला दिसत नाही. त्याचप्रमाणे सुख हे आपल्या आतच असते, पण अज्ञान आणि विकार यामुळे ते झाकले जाते, असे ते म्हणाले.

मिथिला नगरीचे जनकराजे यांच्या दृष्टांतातून त्यांनी स्वप्न आणि वास्तव यातील भ्रामकतेवर प्रकाश टाकला. स्वप्नात अनुभवलेले दुःख आणि जागृत अवस्थेतील सुख हे दोन्ही तात्पुरते आणि बदलणारे असते. हे खरं का ते खरं? या प्रश्नाचे उत्तर जसं ते, तसं हे असेच असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. माणूस भ्रामक सुखाच्या मागे धावत राहतो, कारण त्याला खऱ्या सुखाची जाणीव नसते. सुख हे साधन नसून साध्य आहे, हे अधोरेखित करत त्यांनी सांगितले की, पैसा, घर, गाडी ही साधने आहेत; परंतु आत्मज्ञान आणि मोक्षप्राप्ती हेच खरे आणि शाश्वत सुख आहे, असे ते म्हणाले.

महाराजांनी सांगितले की, संतसंगती, संतकृपा आणि संतविचार यांच्या माध्यमातूनच माणूस खऱ्या सुखाकडे वाटचाल करू शकतो. म्हणूनच संत ज्ञानेश्वर महाराजांनी पसायदानात सर्वांच्या सुखासाठी प्रार्थना केली आहे, असे म्हटले.

सेलू शहराबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, हे शहर मराठवाड्याचे पुणे म्हणून ओळखले जाते आणि सामूहिक पुरुषार्थाचे उत्तम उदाहरण आहे. नुकत्याच पार पडलेल्या फिरत्या ज्ञानेश्वरी सांगता सोहळ्याला मिळालेला प्रतिसाद, तसेच नगराध्यक्ष मिलिंद सावंत यांनी एका महिला भाविकाला स्वतःची खुर्ची देऊन दाखवलेले साधेपण, हे या शहराच्या संस्कारांचे प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पंडित यशवंत चारठाणकर यांनी संत नामदेव महाराजांचा अभंग सादर केला. वसंत प्रतिष्ठानच्या वतीने संतपूजन करण्यात आले. प्रा. संजय पिंपळगावकर यांनी सूत्रसंचालन केले, तर कु. शरण्य मोहकरे, कु. मनवा देशमुख, कु. आरोही ओगले आणि चि. यथार्थ गवलवाड यांनी पसायदान सादर केले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

भगवंताची प्राप्ती, संतांची कृपा आणि सदाचारामध्येच खरे सुख...

संतांचे कार्य हे माणसाला विचाराकडे प्रवृत्त करणे आणि त्याला स्वतंत्र विचार करण्याची क्षमता देणे हे आहे, असे त्यांनी सांगितले. सामान्य माणूस पैसा, सत्ता, संपत्ती यामध्ये सुख शोधतो, पण संतांच्या मते खरे सुख म्हणजे भगवंताची प्राप्ती, संतांची कृपा आणि सदाचार. छत्रपती शिवाजी महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या उदाहरणातून त्यांनी स्पष्ट केले की, संपत्तीमध्ये खरे सुख नसते. माणसाच्या अपेक्षा अमर्याद असतात आणि एक इच्छा पूर्ण झाली की दुसरी निर्माण होते. एका श्रीमंत व्यक्तीचा दृष्टांत देत त्यांनी सांगितले की, अकरा पिढ्या सुखात राहतील इतकी संपत्ती असूनही बाराव्या पिढीची चिंता करणारा मनुष्य कधीच समाधानी होत नाही, असे ते म्हणाले.

गडदव्हाणवाडी येथील पुलाचा प्रश्न मिटला





जिंतूर,/प्रतिनिधी - गडदव्हाणवाडी येथील पुलाचा प्रश्न मिटला जिंतूर जिंतूर तालुक्यातील डोंगराळ भागात असलेल्या गडद गव्हाणवाडी येथील पुलाचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रश्न मार्गी पडला होता परंतु या गावच्या नागरिकांनी पालकमंत्री महोदय यांच्याकडे यांच्याकडे मागणी केली .

या गावाला पावसाळ्यात नागरिकांना करावी लागत होती कसरत गडद गव्हाणवाडी येथील नागरिकांनी वेळोवेळी प्रशासनाकडे मागणी केली परंतु या मागणीची प्रशासनाने अनेक वर्षापासून दखल न घेतल्यामुळे हाप्रश्न सुटला नाही त्यामुळे या फुलाच्या क पुलाचा प्रश्न मिटला ामाची दखल घेऊन परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा कार्यसम्राट राज्यमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांनी या पुलाच्या कामासाठी निधी मंजूर करून प्रत्यक्षात हे काम चालू करण्यात आले आहे त्या पुलाच्या कामाचे उद्घाटन शनिवारी करण्यात आले गडद गव्हाणवाडी या गावाच्या नदीवरील पूल पावसाळ्यामध्ये नागरिकांना करावी लागत होती तारेवरची कसरत पावसाळ्यामध्ये या नदीवरून पाणी जात असताना गावातील नागरिकांचा गावाशी संपर्क होत नव्हता त्यामुळे हा पूल परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री यांनी मंजूर केला व त्याचे उद्घाटन करण्यात आले यावेळी जिल्हा परिषद सदस्य डॉक्टर देवराव कराळे यांच्या हस्ते या पुलाचे उद्घाटन करण्यात आले यावेळी पंचायत समितीचे उपसभापती माधवराव दराडे श्रीरंग राव राठोड संजय राठोड देवसडी येथील सरपंच

शिवाजी काळे वामन राठोड सुदाम राठोड गुत्तेदार ससे साहेब अशोक साबळे श्रीरंग साबळे भास्कर राठोड प्रभाकर राठोड तसेच गावातील नागरी मोठ्या संख्येने उपस्थित होते या कामाच्या उद्घाटनामुळे गावकऱ्यांनी परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्यमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकर व जिल्हा परिषद सदस्य डॉक्टर देवराव कराळे यांचे आभार मानले आहेत

दुःख निवृत्ती म्हणजे सुख नाही : हभप सद्गुरु चैतन्य महाराज देगलूरकर

सेलू,/प्रतिनिधी: माणसाच्या जीवनात जे दुःख प्राप्त झालेले असते, त्याची निवृत्ती झाली की आपण त्याला सुख म्हणतो; मात्र केवळ दुःखाचा अभाव म्हणजे खरे सुख नव्हे, असे स्पष्ट प्रतिपादन हभप सद्गुरु चैतन्य महाराज देगलूरकर यांनी केले.

सेलू येथे साई मंदिर सभागृहात आयोजित वसंत व्याख्यानमालेच्या सातव्या वर्षातील दुसऱ्या पुष्पगुंतन कार्यक्रमात सद्गुरु चैतन्य महाराज देगलूरकर यांनी आशीर्वचनपर मार्गदर्शन करताना मानवी जीवनातील सुख आणि दुःखाच्या संकल्पनेवर अत्यंत सखोल व विचारप्रवर्तक विवेचन केले. पसायदानातील 'किंबहुना सर्व सुखी, पूर्ण होऊनी तीहीं लोकी' या ओवीचे विस्तृत स्पष्टीकरण देताना त्यांनी सांगितले की, भूक लागल्यावर अन्न मिळणे, तहान लागल्यावर पाणी मिळणे किंवा थंडीमध्ये उबदार कपडे मिळणे - हे खरे सुख नसून त्या त्या क्षणी झालेल्या दुःखाची निवृत्ती आहे. परंतु माणूस या निवृत्तीमध्येच सुख मानू लागतो आणि याच मर्यादित विचारात अडकून राहतो.

कापूस दरात मोठी वाढ शेतकऱ्यांना मिळाला चांगला दर - सभापती डॉ. रोडगे

सेलू,/प्रतिनिधी- खाजगी कापूस बाजारात सध्या तेजीचे वातावरण असून दिनांक ०१ एप्रिल २०२६ (बुधवार) रोजी कापसाला समाधानकारक दर मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले. बाजारात कापसाचे किमान ₹७०००, कमाल ₹८४७५ तर सरासरी ₹८४०० इतके भाव नोंदविण्यात आले.

बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील निपाणी टाकळी येथील शेतकरी श्री. रामप्रसाद गिराम यांच्या कापसाला प्रती क्विंटल ₹८४७५ इतका उच्चांक दर मिळाल्याने शेतकरी वर्गात समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

खाजगी कापूस लिलाव विक्रीवेळी बाजार समितीचे सभापती डॉ. संजय रोडगे, संचालक अँड. दत्तराव कदम तसेच कापूस खरेदीदार समशेर, गोपाल काबरा, नारायण शर्मा, पवार साहेब, आशिष बिनायके, सतपाल सिंग यांच्यासह प्रसाद जिनिंग व शिवधारा जिनिंगचे ग्रेडर उपस्थित होते. यावेळी बाजार समितीचे प्रभारी सचिव एकनाथ राउत, कर्मचारी व मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.

यावेळी सेलू कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती डॉ. संजय रोडगे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, कापूस विक्रीस आणताना तो कोरडा व स्वच्छ असावा. तसेच चांगल्या प्रतीचा व फरदड कापूस वेगवेगळा आणल्यास अधिक दर मिळण्यास मदत होते.

तरी बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील सर्व शेतकरी बांधवांनी आपला कापूस विक्रीसाठी बाजार समितीच्या मुख्य कापूस यार्ड, पाथरी रोड येथे आणावा, असे आवाहनही त्यांनी केले.

सेलूतील क्युरियस किड्स व फिनकिड्स शाळेत पदवीदान समारंभ उत्साहात संपन्न

सेलू,/प्रतिनिधी : क्युरियस किड्स व फिनकिड्स शाळेचा लहानग्यांचा पदवीदान समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात दि. ४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता शाळेच्या प्रांगणात यशस्वीरीत्या पार पडला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला असून, हा दिवस सर्वांसाठी अविस्मरणीय ठरला.

या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून, श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मा. डॉ. संजय रोडगे, डॉ. सविता रोडगे, डॉ. आदित्य रोडगे

तसेच, मुख्याध्यापिका प्रगती क्षिरसागर, प्राचार्य कार्तिक रत्नाला यांची विशेष उपस्थिती कार्यक्रमाची शोभा वाढवणारी ठरली. विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या मुलांच्या यशाचा आनंद साजरा करताना दिसले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, भाषणे आणि नृत्य सादरीकरण करून उपस्थितांचे मने जिंकली. लहानग्यांचा आत्मविश्वास आणि उत्साह पाहून सर्वांनी त्यांचे कौतुक केले.



समारंभात विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रगतीबद्दल प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. यावेळी शिक्षकांनी घेतलेले परिश्रम आणि पालकांचे सहकार्य यांचा विशेष उल्लेख करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एका नवीन प्रवासाची सुरुवात झाली असून, हा दिवस विद्यार्थ्यांसाठी, पालकांसाठी आणि शिक्षकांसाठी आनंद, अभिमान आणि समाधानाचा क्षण ठरला.

महिला पोलिस कर्मचाऱ्याबरोबर दमदाटी केल्याबद्दल आरोपीस सहा महिने साधी कैद : २००० रुपये दंड

सेलू,/प्रतिनिधी : येथील शहर वाहतूक शाखेतील महिला पोलिस कर्मचाऱ्याबरोबर दमदाटी केल्याबद्दल जिल्हा व सत्र न्यायाधीश एन.आर. नाईकवाडे यांनी आरोपी मुनवर खान नूर खान (रा. काद्राबाद प्लॉट) यास सहा महिने साधी कैद, दोन हजार रुपये दंड, दंड न भरल्यास एक महिना साधी कैदची शिक्षा सूनावली.

८ डिसेंबर २०२१ रोजी कोतवाली पोलिस ठाण्यात शहर वाहतूक शाखेतील पोलिस कर्मचारी तेजश्री गायकवाड यांनी एक तक्रार दाखल केली. जिंतूर रस्त्यावर आपण कर्तव्यावर असतांना दुपारी १.२० मिनीटांनी मुनवर खान नूर खान यास गाडी थांबवण्याचे सांगितल्यानंतर त्याने जोरजोरात ओरड करीत अंगावर धावून येण्याचा प्रयत्न केला. तसेच फाईन केल्यास तुमची मशीन व मोबाईल फोडून टाकीन, असे म्हणत अंगावर धावून आला, असे नमूद केले. त्याआधारे पोलिसांनी संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल करीत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सहाय्यक सरकारी अभियोक्ता आनंद गिराम यांनी या प्रकरणात सरकार पक्षातर्फे बाजू मांडत चार साक्षीदार तपासले. व्हिडीओ रेकॉर्डींग न्यायालयासमोर गुन्हा सिध्द करण्यास कारणीभूत ठरली. संशयापलिकडे जावून आरोपीने बळाचा वापर करुन शासकीय कामात अडथळा निर्माण केला, ही बाब सिध्द झाल्याने न्यायालयाने संबंधितास शिक्षा ठोठावली. या प्रकरणात कोर्ट पैरवी अधिकारी पोलिस उपनिरीक्षक सुरेश चव्हाण, पोलिस हेड कॉन्टेबल कुंडगिर यांनी काम पाहिले.

कार्यकर्ताच जिल्हाध्यक्ष व्हावा ही खासदार राहुल गांधींची विचारधारा : काँग्रेसचे परभणी जिल्हा नियुक्त केंद्रीय निरीक्षक अजमतुल्लाह हुसेनी

परभणी ,/प्रतिनिधी: कार्यकर्ताच जिल्हाध्यक्ष व्हावा ही खासदार राहुल गांधींची विचारधारा : काँग्रेसचे परभणी जिल्हा नियुक्त केंद्रीय निरीक्षक अजमतुल्लाह हुसेनी उपस्थितहोते.

काँग्रेस पक्षाचा आगामी काळात होणारा जिल्हाध्यक्ष हा निष्ठावान कार्यकर्ताच व्हावा ही खासदार राहुल गांधी यांची विचारधारा आहे, त्यामुळे काँग्रेसच्या सिध्दांतानुसार कार्य करणाऱ्याचीच जिल्हाध्यक्ष म्हणून निवड होईल, अशी माहिती काँग्रेसचे परभणी जिल्हा नियुक्त केंद्रीय निरीक्षक अजमतुल्लाह हुसेनी यांनी आज शनिवार ४ एप्रिल रोजी पत्रकार परिषदेत दिली.

काँग्रेस पक्षाने देशभरात संघटन बळकट करण्यासाठी संघटन सृजन अभियान राबविण्यास सुरुवात केली आहे. त्या अभियानातून महाराष्ट्रात ३७ केंद्रीय निरीक्षक आणि १८३ वरिष्ठ नेत्यांच्या माध्यमातून संघटनात्मक पुनर्रचना केल्या जात आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार परभणी जिल्ह्यात या अभियानाची प्रभावी अंमलबजावनी करण्यात येत असून याच अनुषंगाने जिल्ह्याचे नियुक्त केंद्रीय निरीक्षक अजमतुल्लाह हुसेनी आणि जितेंद्र देहाडे यांनी आज परभणीत दाखल होताच काँग्रेसजणांशी हितगूज करीत माध्यमांच्या प्रतिनिधींशीही संवाद साधला.

हुसेनी म्हणाले, संविधानावर काँग्रेस पक्षाची उभारणी झाली आहे. त्यामुळे या संवैधानिक पध्दतीनेच जिल्हाध्यक्षांच्या निवडी व्हावेत, ही खासदार गांधी यांची विचारधारा आहे. यापूर्वी परंपरागत पध्दतीने जिल्हाध्यक्षांची निवड होत होती, मात्र संघटनसृजन अभियानानुसार यापुढे कार्यकर्त्यांना संधी देण्यात येईल, या संदर्भात पक्षाचे वरिष्ठ नेते महिला पदाधिकारी, विधानसभा अध्यक्ष, सामाजिक संस्था, पत्रकार यांच्याशी चर्चा करुन प्राप्त झालेल्या नावांमधुन जिल्हाध्यक्षांची निवड करण्यात येईल. जिल्हाध्यक्ष निवडीसाठी संबंधित कार्यकर्ता हा कमीत कमी ३ वर्षांपासून काँग्रेस कमिटीचा कार्यकर्ता असावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. ही निवड पारदर्शक पध्दतीने होईल, असेही ते म्हणाले. ते पुढे म्हणाले, राज्यात आणि केंद्रात सत्तेत असलेल्या भाजप सरकारवर नागरीकांचा रोष आहे. त्यामुळे त्यांच्या समस्या जाणून घेण्याचाही आम्ही प्रयत्न करत आहोत, असेही ते म्हणाले.




या पत्रकार परिषदेत माजी खासदार तुकाराम रेंगे पाटील, माजी आमदार सुरेश दादा देशमुख, माजी उपमहापौर तथा नगरसेवक भगवान वाघमारे, शहराध्यक्ष नदीम इनामदार, प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब देशमुख, रविराज देशमुख, नगरसेवक गुलमीर खार, सुनील देशमुख, जिल्हा परिषद सदस्य अजित वरपुडकर, आलमगीर खान आदी पदाधिकारी उपस्थित होते.

रोखठोक

दिनेश गुणे

खडतर तपश्चर्येची यशस्वी सांगता!

महाराष्ट्रात तेव्हा काँग्रेसप्रणीत आघाडी सत्तेवर होती. ऑक्टोबर २०१० मध्ये एका मंत्रिमडळ बैठकीत नक्षल प्रश्नावरील चर्चेत महाराष्ट्राचे तेव्हाचे गृहमंत्री आर. आर. पाटील यांना काही सहकाऱ्यांनी घेरले आणि दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात त्याचीच बातमी झाली. नक्षल प्रश्नावर 'आबां'ना मंत्र्यांनी घेरले, फटकारले, नक्षल हा फक्त 'कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न आहे' वगैरे मथळ्यांच्या या बातम्यांना प्रत्युत्तर देणाऱ्या एका लेखाद्वारे आर. आर. पाटील यांनी चांगलाच समाचार घेतला. अधिकृत प्रेस ब्रिफींग करूनही जेवढे चांगले सांगता आले नसते, त्यापेक्षा व्यवस्थितपणे बातमी 'लीक' करणाऱ्या माझ्या सहकाऱ्यांचे मी कौतुक करतो. त्यांचा मंत्री म्हणून राज्याला किती फायदा आहे, यापेक्षा अशी व्यक्ती मंत्री झाल्याने राज्य एका चांगल्या पत्रकाराला मुकल्याचे मला दुःखही आहे, असे बोचरे चिमटे काढत त्यांनी महाराष्ट्रातील नक्षलवाद समस्येचे नेमके पदरही त्या लेखातून उलगडून दाखविले. त्याच बैठकीच्या दरम्यान महाराष्ट्रातील नक्षलप्रभावित गडचिरोली जिल्ह्यात नक्षली हल्ल्यामध्ये दोन पोलिस अधिकारी, दोन केंद्रीय राखीव पोलिस दलाचे जवान तर छत्तीसगडच्या सीमेनजीक तीन 'इंडो तिबेटियन बॉर्डर पोलिसां'चे जवान हुतात्मा झाले होते. या लढाईत तीन विद्यार्थ्यांसह पाच निरपराध नागरिकांचा बळी गेला होता. याचा उल्लेख करताना, महाराष्ट्राच्या पोलिस दलाने नक्षलविरोधी संघर्षात शौर्य दाखविले असले, तरी एखादी 'स्ट्रॅटेजी' कमी पडते, प्लॅन फसतो व पोलिसांना हुतात्मा व्हावं लागते, याची कबुलीही त्यांनी दिली होती. माओवादी किंवा नक्षलवादी आपला संपूर्ण 'कोड ऑफ कंडक्ट' तयार ठेवतात आणि कोणत्या गोष्टीचा कशा प्रकारे फायदा घ्यावयाचा, हे योजनापूर्वक ठरवितात. 'टेकिंग ॲडव्हान्टेज ऑफ बॅड गव्हर्नंस ऑफ ब्युरोक्रसी ॲण्ड पोलिटिशियन' म्हणजेच प्रशासनाची आणि राज्यकर्त्यांची राज्य करण्याच्या आणि प्रशासन राबविण्याच्या पद्धतीतील चुका शोधून त्यांचा फायदा घेणे आणि सामान्य जनतेच्या प्रशासनाकडून होणाऱ्या उपेक्षेचे भांडवल करून त्याचा नक्षलवाद वाढण्यासाठी उपयोग करणे, ही नक्षल्यांची कार्यपद्धती त्यांनी अचूकपणे अधोरेखित केली होती. नक्षलवाद हा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न आहेच; पण तो सामाजिक, राजकीय व आर्थिक प्रश्नही आहे. त्यामुळे 'नक्षलवादाचे उत्तर केवळ पोलिसांच्या गोळीतच नव्हे, तर सचिवालयाच्या सहाही मजल्यांतील दालनांत शोधावे लागेल,' हे त्यांचे विधान त्यावेळी अधोरेखित झाले होते. नक्षलवादी हे आपल्या लोकशाही व्यवस्थेला 'शोषकांची दलाल पद्धत' मानतात व निवडणुकांना शोषक व्यवस्थेचा भाग मानतात. ही जर माओवाद्यांची धारणा असेल, तर जनतेला पटतील व जाणवतील अशा सुधारणा क्रमप्राप्त ठरतात. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य व पायाभूत सुविधा सर्वांनाच देण्याचं धोरण ठरवावे लागेल. पोलिसांबरोबरच सर्वच राजकीय पक्षांना या लढाईत उतरावे लागेल. नक्षलग्रस्त भागाचा विकास झाला नाही, हे कबूल करून जाणीवपूर्वक पावले उचलावी लागतील. लोकांना आपले वाटेल असे प्रशासन दिसावे लागेल. आदिवासींना वनजमीन हक्क पट्ट्याची कामे मंद गतीने होतात, पण खाण मालकांना शेकडो एकर जमिनीचे कब्जे देणाऱ्या फाईल मात्र शीघ्रगतीने का धावतात, याचा शोध घ्यावा लागेल. थोडक्यात, नक्षलवादाचे खरे उत्तर हे विकासाच्या माध्यमातूनच सापडू शकेल. त्यासाठी मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा निर्माण करणे, जमीन ओलिताखाली आणणे, पिढ्यान्‌पिढ्या आदिवासी कसत आहेत, त्या जमिनी त्यांच्या नावावर करणे व बेरोजगारांना काम देणे, चांगले शिक्षण, चांगले आरोग्य व दारिद्र्य निर्मूलन हा त्याच्यावरील खरा उपाय आहे, असे त्यांनी आपल्या एका चिंतनपर लेखात नमूदही केले होते...



नक्षलवाद समूळ उच्चाटनाचा विडा

महाराष्ट्राच्या तत्कालीन गृहमंत्र्यांच्या या मुक्त चिंतनातून राज्यातील नक्षल समस्येचे नेमके चित्र स्पष्टपणे उमटले असतानाही, नक्षलवादाचा बीमोड करण्यात तेव्हाचे राज्य शासन मात्र कमी पडले, हे स्पष्ट होते. पोलिस दले सक्षम असतानाही, केवळ प्रबळ इच्छाशक्तीचा अभाव हे बहुधा त्यामागील कारण असावे. ही इच्छाशक्ती पुढे चार वर्षांत पुन्हा दिसू लागली. केंद्रात आणि महाराष्ट्रात भाजपाप्रणीत सरकारे सत्तेवर आल्यानंतर नक्षलवादाच्या समूळ उच्चाटनाचा विडा उचलला गेला आणि 'मिशन मोड'वर माओवाद निपटण्याच्या आखणीबद्ध मोहिमा सुरू झाल्या. या केवळ नक्षलविरोधातील युद्धापुरत्या मर्यादित नव्हत्या तर ज्या कमकुवत दुव्यांचा फायदा घेऊन नक्षलवादास खतपाणी मिळते, ते दुवे मजबूत करण्याची एक अभ्यासपूर्ण मोहीम होती. महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली या मोहिमेने वेग घेतला आणि त्याची फळे गेल्या १२ वर्षांच्या तपश्चर्येतून दिसू लागली. म्हणूनच, महाराष्ट्राचा शेवटचा जिल्हा असलेला गडचिरोली जिल्हा नक्षलमुक्त होऊन आता राज्याचा पहिल्या क्रमांकाचा जिल्हा ठरला आहे. या जिल्ह्यातील पायाभूत सुविधांचा विकास, रोजगाराच्या संधी, उद्योगस्नेही वातावरण निर्मितीसाठीचे योजनाबद्ध प्रयत्न यामुळे गडचिरोली जिल्ह्याने आता सुरक्षिततेचा निःश्वास सोडलेला असताना गेल्या १२ वर्षांच्या सामुदायिक तपश्चर्येचे फळ मिळाल्याची सुखद घोषणा संसदेत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केली. भारत आता माओवादापासून मुक्ततेच्या उंबरठ्यावर दाखल झाला आहे आणि नक्षली कारवायांपासून देशाला मुक्तता मिळवून देण्याच्या केंद्र सरकारच्या कटिबद्धतेला यश मिळाले आहे, अशी ग्वाही अमित शाह यांनी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अलिकडेच दिली, तेव्हा कटिबद्धता आणि दुर्दम्य इच्छाशक्ती यामुळे परिवर्तन शक्य होते, याची खात्री देशाला पटली आहे. यावर चित्र काढा

सुमारे ९ वर्षांपूर्वी, मे २०१७ मध्ये तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह यांनी नक्षलग्रस्त राज्यांच्या मुख्यमंत्री, मुख्य सचिव, पोलिस महासंचालक व सुरक्षा यंत्रणांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत देशातील माओवादी कारवायांचा आढावा घेताना, या समस्येने सर्वाधिक प्रमाणात ग्रासलेल्या ३५ जिल्ह्यांत सुरक्षेबरोबरच विकास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीलाही प्राधान्य देण्याची बाब अधोरेखित केली होती. जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था खिळखिळी करणे हे माओवादी कारवायांचे उद्दिष्ट असून नव्या भारताच्या निर्मितीची मोदी सरकारचा संकल्प हाणून पाडण्यासाठी विकासास विरोध करणाऱ्या माओवाद्यांच्या हिंसक कारवाया रोखण्याचा संकल्प त्यांनी या बैठकीतही बोलून दाखविला होता. बंदुकीच्या धाकाने विकास आणि लोकशाहीला झुकविण्याचे माओवाद्यांचे प्रयत्न यशस्वी होऊ द्यायचे नाहीत, या निर्धाराचा उच्चार या बैठकीत झाला आणि केंद्र सरकार माओवादग्रस्त राज्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचा संदेशही देशाला मिळाला. त्याआधीच्या दोन दशकांत माओवाद्यांच्या हिंसाचारात देशातील १२ हजार लोकांचे बळी गेले होते. त्यापैकी तब्बल २७०० सुरक्षा कर्मचारी होते. म्हणजेच, सुरक्षा व्यवस्था खिळखिळी करण्याबरोबरच विकास योजनांना बळ देणाऱ्या रस्ते, पूल, रेल्वेमार्ग, वीज आणि दळणवळण यंत्रणांसारख्या सार्वजनिक संपत्तीचे नुकसान करणे हा त्यांचा हिंसक कार्यक्रम होता. दुर्गम भागांत या सुविधा पोहोचल्या तर तेथील जनता मुख्य प्रवाहाशी जोडल्या जातील, त्यामुळे या सुविधांपासून जनता वंचित राहिली तर गरिबी आणि उपेक्षा यामुळे आपल्या कारवायांचे लक्ष्य करणे सोपे व्हावे ही माओवाद्यांची रणनीती त्यांनी अधोरेखित केली होती. मात्र, बंदुकीच्या गोळ्यांनी ही समस्या सोडविता येणार नाही व त्यासाठी 'शॉर्टकट'देखील नाही, त्यामुळे दीर्घकालीन उपाय करणारा तोडगा काढणारे समर्थ नेतृत्व आणि प्रखर इच्छाशक्ती यातूनच या समस्येवर मात करता येईल, असे राजनाथ सिंह यांनी म्हटले होते. सरकारकडे माओवाद्यांशी सामना करण्यासाठी पुरेशी संसाधने आहेत, प्रशिक्षण आहे, पण केवळ तेवढे पुरेसे नाही, तर आखणीबद्ध प्रयत्न, या समस्येकडे पाहण्याची योग्य दृष्टी, उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर, शत्रूच्या कमकुवतपणाचे नेमके आकलन या बाबी लक्षात घेऊन माओवाद निपटण्याची मोहीम येथून गतिमान झाली होती. त्याआधी २०१५ मध्ये माओवादाची समस्या समूळ नष्ट करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर धोरण आणि कार्यक्रम आखला गेला. सुरक्षाविषयक उपाय, विकास योजनांची आखणी व अंमलबजावणी, स्थानिक जनसमुदायांच्या सहभाग व सहकार्याच्या योजना व समस्याग्रस्त समाजाची सुविधांच्या अभावग्रस्ततेपासून मुक्तता झाली तरच या कारवायांना आळा घालणे शक्य होणार हे स्पष्ट झाले आणि या धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली. आज सुमारे एका तपाच्या कठोर अंमलबजावणीनंतर त्याचे परिणाम स्पष्ट झाले आणि माओवादापासून मुक्तीचा सोहळा साजरा करण्यासाठी देश सज्ज झाला. केंद्र आणि राज्य सरकारांनी आत्मसमर्पण करणाऱ्या माओवाद्यांच्या पुनर्वसनाच्या व सुरक्षिततेच्या योजना तयार केल्या, शरणागतांना समाजाच्या प्रवाहात सामील होणे सोपे व्हावे याकरिता प्रोत्साहनपर अनुदानासारख्या योजना आखल्या गेल्या, त्यांना कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी मासिक पाठ्यवेतन देण्याची तरतूदही या योजनेतून करण्यात आली आणि योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता वेळोवेळी भाषणाऱ्या गरजेनुसार योजनेत सुधारणा करण्यात आल्या. एका बाजूला नक्षलवाद्यांना मूळ प्रवाहात समावून घेताना, सुरक्षा यंत्रणांच्या बळकटीकरणावर जोर देण्यात येत होता. पोलिस दलांचे आधुनिकीकरण, राज्य सरकारांना शस्त्रपुरवठा, संदेशवहनाच्या अत्याधुनिक यंत्रणा, पोलिस ठाण्यांची निर्मिती, वाहने, पोलिसांकरिता घरे आदी योजनांद्वारे पोलिस दलांचे बळकटीकरण करण्याची व्यापक मोहीम राबविली गेली.

विकासाच्या योजनांवर भर

गेल्या सुमारे सात वर्षांत नक्षलग्रस्त क्षेत्रात ४०० हून अधिक सुरक्षा शिबिरे स्थापन झाली आहेत. माओवाद्यांच्या कारवायांना मिळणारी आर्थिक रसद हा या समस्येचा एक महत्त्वाचा पैलू ठरला आहे. माओवादी आणि त्यांचे वित्तपुरवठादार यांची साखळी मोडण्यासाठी अशा पुरवठादारांचा शोध घेण्याच्या मोहिमाही शिस्तबद्धरीतीने आखल्या गेल्या आहेत. त्यासाठी २०१६ मध्ये केंद्र सरकार आणि राज्यांच्या स्तरावर देखरेख ठेवणाऱ्या यंत्रणा व मल्टी डिसिप्लिनरी ग्रुप स्थापन करण्यात आले. शिवाय समस्याग्रस्त भागांत रस्ते, दळणवळण व संपर्क साधनांचा विस्तार, आर्थिक तरतूद, शिक्षण व कौशल्य विकासाच्या योजनांवर भर देण्यात आला आणि गेल्या सहा-सात वर्षांत माओवादी कारवायांना पोखरलेल्या भागांत तब्बल १७ हजार ३१९ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे जाळे उभे राहिले. ११ हजार ५०० हून अधिक मोबाईल टॉवर लागले, कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी सुमारे ५० आयटीआय संस्था स्थापन झाल्या आणि दुर्गम भागांत गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सुविधा देण्यासाठी सुमारे २६० एकलव्य निवासी शाळा स्थापन करण्यात आल्या. सहा हजारांहून अधिक टपाल कार्यालये सुरू करण्यात आली. त्यामध्ये बँकिंग सेवांचाही समावेश करण्यात आला. १३०० हून अधिक एटीएम केंद्रे कार्यान्वित झाली. या दुहेरी योजनांमुळे माओवाद्यांच्या कारवायांचे कंबरडे मोडणे शक्य झाले. २०१३ मध्ये देशातील १२६ जिल्हे माओवादी कारवायांच्या कचाट्यात होते. २०२६ मध्ये केवळ दोन जिल्ह्यांत माओवादाची धुगधुगी शिल्लक राहिली होती. गेल्या महिनाअखेरीस केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लोकसभेत डाव्यांच्या कारवायांची चिरफाड करून त्यांचा चेहरा देशासमोर उघड केला. गेल्या १२ वर्षांच्या एका तपश्चर्येची सफल पूर्तता झाल्याचे जाहीर करताना शाह यांनी या विचारधारेच्या देशनिष्ठेवरही प्रहार केले. जी विचारधारा अन्य एखाद्या देशाच्या विचारधारेच्या प्रेरणेतून उगम पावली आहे, ती भारताच्या हिताची नाहीच, हेदेखील त्यांनी ठामपणे नमूद केले. लाल आतंकाची सावली पडल्यामुळे देशाचे दुर्गम भाग विकासापासून सतत वंचित राहिले, आता ती सावली दूर झाली आहे आणि विकासाचे पर्व सुरू झाले आहे. नक्षलमुक्त भारताचे मोदी सरकारचा संकल्प आता पूर्ण झाला आहे. हे एक ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण यश आहे. सशस्त्र पोलिस दलांची समर्पित सेवा, कोबरा व सीआरपीएफ जवानांची सतर्कता, राज्य पोलिस, छत्तीसगड पोलिस, डीआरजी आणि विशेषतः स्थानिक आदिवासी समाज यांच्या एकत्रित प्रयत्नांचा या यशामध्ये मोठा वाटा आहे. ज्या क्षेत्रात माओवाद्यांच्या कारवायांमुळे विकासाचे वारेदेखील पोहोचू शकत नव्हते, तेथे आता घराघरांत विकासाची फळे चाखता येतील, अशी ग्वाही शाह यांनी दिली आहे. अशा कारवायांपुढे गुडघे न टेकता त्यांना त्यांच्या कर्माची योग्य ती फळे चाखावयास मिळतील यासाठी मोदी सरकार सदैव दक्ष असेल, अशी ग्वाही देत अमित शाह यांनी माओमुक्तीच्या संकल्पपूर्तीची तारीख जाहीर केली होती. ३१ मार्च २०२६ ही केवळ एका आर्थिक वर्षाची अखेर नव्हती, तर नव्या आर्थिक उन्नतीची सुरुवात आहे, हे आता देश अनुभवत आहे. माओवादी विचारधारा या देशात कधीही स्वीकारली गेली नाही, ही विचारसरणी येथे पुरती फसली आहे, त्यामुळे अस्तित्व टिकविण्यासाठी वेगवेगळे सिद्धान्त पुढे आणण्याचा त्यांचा प्रयत्नदेखील फसला आहे. प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणेतील त्रुटींचा आधार घेऊन हिंसक कारवाया करण्याचा डाव यापुढे कधीही यशस्वी होऊ दिला जाणार नाही, असा इशाराही शाह यांनी दिला आहे. कित्येक दशकांपासून देशाला ग्रासून राहिलेल्या आणि नाही रे वर्गाला विकासापासून वंचित ठेवणाऱ्या एका वाळवीचा पुरता बंदोबस्त झाल्याने, मोदी सरकार आणि राज्य सरकारच्या या ऐतिहासिक यशाची दखल घ्यायलाच हवी. ▮

dineshgune@gmail.com

रविवारची पत्रे

महापौरांना पत्र

नागपूर हे विश्वविख्यात हिंदू संघटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या संघ गंगोत्रीचे उगमस्थान. कै.डॉ. हेडगेवार, प.पू. श्री. गुरुजी, प.पू. बाळासाहेब देवरस यांची कर्मभूमी. प.पू. डॉ. आंबेडकरांनी याच शहरात आपल्या अनुयायांना बौद्ध दीक्षा दिली. अशा ऐतिहासिक शहराच्या सर्वोच्च सिंहासनावर आपण स्थानापन्न झालात याबद्दल त्रिवार अभिनंदन. रस्ते पाणी व वीज या कोणत्याही शहरांच्या मूलभूत समस्या असतात. त्याबद्दल बहुतांश नागरिक आपणाकडे सूचना करतात. या सूचनांचा आपल्या नगरसेवकांकडून पाठपुरावा होत असतो. त्यासोबत शिक्षण आणि आरोग्य हेही क्षेत्र महत्त्वाचे आहेत. महापालिकेद्वारे चालविला जाणाऱ्या शाळांना दर्जा फारसा चांगला नाही. काही ठिकाणी अवश्य सुधारणा झालेल्या आहेत. तेथील विद्यार्थ्यांची भाषा सुधारण्याकरिता शक्यतोवर वर्ग पाच पासून संस्कृत विषय चालू करावा. चित्रकलेवर भर द्यावा. चित्रकलेमुळे हस्ताक्षर सुधारतात. वर्ग ८ वरील विद्यार्थ्यांना अयोध्या येथील नवनिर्मित श्रीराम मंदिर, छत्रपती शिवाजी राजांकडून अफजलखानाचा वध असे चित्र काढता यायला पाहिजे. शाळांची मैदानं स्वच्छ असावी. कबड्डी, खो-खो, आट्यापाट्या असे पारंपरिक खेळ आजच्या विद्यार्थ्यांना खेळता आली पाहिजे. शाळा प्रारंभ होण्यापूर्वी सामूहिक प्रार्थनेच्या वेळी सरस्वती स्तवन व्हायला पाहिजे. शाळा सुटण्यापूर्वी लोकमान्य टिळकांना समर्पित पद...

'तव स्मरण संतता स्फुरणीदायी आम्हा घडो।
त्वदीय गुणकिर्तने ध्वनी सुरम्य कानी पडो।
स्वदेशहित चिंनताविन दुजी कथा नावडो।
तुझ्या समची आमुची तनूही देशकार्यी पडो।

विद्यार्थ्यांकडून वदवून घ्यावे. विद्यार्थ्यांकडून पसायदान म्हटले जावे. वाचनालयात भारत-भारतीची पुस्तके असावी. कर्नाटकातील बहुतांश शाळांमध्ये भारत-भारतीची पुस्तके लावलेली आहेत असे ऐकले आहे. प्रत्येक खोलीत सरस्वती देवीची प्रतिमा असावी. शाळांच्या प्रांगणात भिंतीच्या कडेला कडुलिंब, औषधी वनस्पती, फळाफुलांची झाडं लावावी. येत्या पावसाळ्यात हा उपक्रम राबवावा. महापालिकेच्या इस्पितळांमध्ये सायंकालीन आरोग्य सेवा असावी. सामान्यतः मोलमजुरी करणारा वर्ग सकाळीच कामाला निघून जातो. सरकारी दवाखाने सकाळपासून दुपारपर्यंत चालू असल्यामुळे हा मजूरवर्ग आरोग्य सेवेपासून वंचित राहतो. तेव्हा किमान महापालिकेद्वारे त्यांना आरोग्य सेवा मिळू शकतील.


शहरातील बसचे व्यवस्थापन महानगरपालिकाकडे आहे. जयताळा, बेसा, वडद येथून सुटणाऱ्या बसेस चक्क त्या त्या स्थानकांचा बोर्ड असतो. इतर सगळ्या बसेस गंतव्य स्थानांचा बोर्ड असतो. परंतु येथे उलट आहे. या बसेस वर तिथून सुटणाऱ्या स्थानकांची नावे असतात. परंतु त्या बसेस पुढे कुठे जातात, याची माहिती नसल्यामुळे प्रवाशांची पंचाईत होते. एकदा एक प्रवासी माटे चौकातून जयताळा लिहिलेल्या बसमध्ये चढले. परंतु तिकीट काढताना त्यांच्या असे लक्षात आणून देण्यात आले की, उपरोक्त बस बर्डीला जाते. बसेसवर फिरती नावे कशाला हवी? नागपुरात फिरती नावे असल्यामुळे धड वाचता येत नाही. तोपर्यंत बस पुढे निघून जाते. एक प्रवासी बस पकडण्यासाठी उभे होते. पिपळाफाटा ते फ्रेंड्स कॉलनी ही बस असावी तेव्हा त्यांना फाटा ते फ्रेंड्स हीच अक्षरे वाचता आली. तोपर्यंत बस पुढे निघून गेली म्हणून स्थिर नावे असावीत.

दादा हांडेकर/९२०९८५३६७१

●● ●●

काय हरवले सांग, शोधिशी...

दिल्लीवरून शिकागोला जाणारी मध्य रात्रीची फ्लाईट मला गाठायची होती. त्यासाठी नागपूर विमानतळाकडे निघालो होतो. अमरावतीच्या इतवारी भागातील गर्दी टाळायला म्हणून चालकाने कार गाडगेनगर रस्त्याकडे वळवली आणि मला महाविद्यालयीन काळातले दिवस आठवायला लागले.



टोलेजंग इमारतींनी व्यापलेल्या भागात तेव्हा शेती होती. विदर्भ महाविद्यालयाच्या गेटपाशी कार येताच थांबविली. काळ्या पाषाणाची बुलंद इमारत समोर होती. रविवार असल्याने शुकशुकाट होता. गार्डनला वळसा घालून जाणारे दोन रस्ते होते. डावीकडच्या रस्त्याने निघालो. गार्डनच्या कंपाऊंड जवळच्या कोपऱ्यावर थबकलो. वाटलं, आता तास संपल्याची बेल होईल... हा कॉर्नर म्हणजे सौंदर्य न्याहाळण्याची आमची जागा होती. थोडं पुढे पार्चजवळ आलो. टाळ्यांचा कडकडाट कानात गुंजायला लागला... कानावर संगीताचे स्वर यायला लागले... आमच्या अभ्यासक्रमात कविवर्य तांबांची समग्र कविता होती. तांबांच्या कवितांवर स्पर्धकाने लिहायचं आणि या कार्यक्रमात ते वाचून दाखवायचं. मी 'कळा ज्या लागल्या जीवा' या तांब्याच्या अजरामर कवितेवर स्वतंत्र समीक्षा लेख लिहिला होता. आयुष्यात संगीताच्या अनेक मैफिलींना गेलो. अनेकांना भेटलो, पण मला अनेकदा प्रश्न पडतो, ईश्वरीय अलौकिकत्व लाभलेले कलावंत क्षणिक मोहात का अडकतात? अस्वस्थ मनाने पुढे सरकलो. त्या काळात असलेल्या प्राध्यापक विश्राम कक्षाच्या बाजूला कॉमनरूम होती आणि त्याच्यासमोरच्या त्रिकोणी आकाराचा जागेत होता चाफा... चाफ्याला निरखत राहिलो...सहा वर्षांच्या कालावधीतले असंख्य प्रसंग पिंगा घालायला लागले. वेळ मिळेल तेव्हा चाफ्यासमोरच्या पायऱ्यांवर येऊन बसायचो. चाफ्याच्या बुंध्याशी उंचवटा केला होता. कसाबसा त्यावर चढलो. चाफ्यावरून हळुवारपणे हात फिरवायला लागलो. तो स्पर्श त्यालाही जाणवला असावा... का कोण जाणे, पण माझ्या डोळ्यातून अश्रू वाहायला लागले. आवेगाने त्याला कवटाळलं.. त्याचा बुंध्यावर डोकं टेकवलं. डोळे मिटले गेले...

किती वेळ गेला देव जाणे.. कसल्याशा आवाजाने मी भानावर आलो... चालक मला हाका देत होता. ताफ्याला कवटाळून अश्रू गाळणाऱ्या मला बघून तो घाबरून गेला होता.

''सर काय झालं? केव्हाचा शोधतोय तुम्हाला.'' मी डोळे पुसले. चाफ्यावरून हळुवार हात फिरवला आणि बाहेर पडलो. कार नागपूर विमानतळाच्या दिशेने धावत होती...

डॉ. सुभाष गढीकर/९८५०८२४५९०

●● ●●

आला वसंत...

किती तयारी करतो निसर्ग ऋतुबदलाची! होळीनंतर सुरू झालेली पानगळती चैत्रातच पूर्ण होते. रामजन्माच्या वेळी हे वृक्षराज सावली देण्यासाठी थंडावा देण्यास सिद्ध होतात. उन्हाळ्यात बाष्पीभवन होणारी पाने आपल्यावर मायेची थंड सावली धरतात. आजोबांनी लावलेल्या झाडाच्या छायेत नातवंड खेळतात. उन्हाळ्याच्या सुट्टीत वाडीतील आंब्याच्या झाडाला, निंबाच्या झाडाला झोका बांधायचा अन् उंच झोका घ्यायचा. चैत्रातलं ऊन असो की वैशाखातला वणवा, भान कुठे असते खेळताना! झाडाची सावली, सावलीतील झोका, झोक्याने अंगाला थंडावा देणारी हवा, त्यातच सुकणारा घाम. मज्जाच मज्जा! अंगातील शक्ती अशी खेळण्यात कामी येई. कधी ऊन लागलं तर आजी गुळाचे पाणी, गाठीचे पाणी, टरबूज-खरबुजांच्या फोडी देई. ज्वारीच्या धांड्याचा बैल अन् बैलबंडी बनवणे हा सुट्टीतील एक विशेष खेळ होता. वाळलेल्या चिंचातील चिंचोका काढून त्याने 'चवकट' (चौपट) खेळणे मजेशीर असे. शेतात जाणे, उन्हाळी पिकांना देण्यात येणाऱ्या पाण्यात खेळणे नित्यक्रम असे. विहिरीत वरून उड्या मारून पोहणे शिकणे सर्वमान्य होते. विहिरीच्या बाजूने मोठ्या झाडांची दाट सावली शीतलता प्रदान करायची. अशा आज मात्र केवळ गोड आठवणीच राहिल्यात. कारण सुधारणेच्या नावाने झाडांची होणारी कत्तल दिवसानुगणीक वाढते आहे. हे कुठंतरी थांबावं असं नाही का वाटत? ▮


डॉ. उज्ज्वला देशमुख/९४२२८०७२४७

राष्ट्रसंतांची पत्रकारिता

वंदनीय राष्ट्रसंतांच्या प्रेरणेने ५ एप्रिल १९४३ रोजी चैत्र-शुक्ल प्रतिपदा (गुढीपाडवा) या शुभ मुहूर्तावर 'श्रीगुरुदेव' या मासिक पत्राचे प्रकाशन सुरू झाले. लोकशिक्षण, लोकजागृती, लोकोद्धार ही उद्दिष्टे उराशी बाळगून भारताची आध्यात्मिक परंपरा ग्रामोद्धार समाजोद्धार व राष्ट्रोद्धारासाठी वंदनीय महाराजांनी पत्रकारितेचे माध्यम अंगीकारले.

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांनी श्रीक्षेत्र गुरुकुंज मोझरी येथे ४ एप्रिल १९३५ रोजी चैत्र शुक्ल प्रतिपदा (गुढीपाडवा) या सुमुहूर्तावर श्रीगुरुदेव सेवा मंडळाची स्थापना केली. सगळ्यांना सोबत घेऊन संपूर्ण समाजाला एका धाग्यात बांधणे व त्यातून राष्ट्रप्रेम, एकता व मानवतेचा जागर करणे हे उद्दिष्ट होते. वंदनीय राष्ट्रसंतांना समाजातील अनावश्यक रुढी व कुरीतींपासून सामान्य जनतेला मुक्त करून तसेच त्यांचे ठिकाणी स्वत्वाची जाणीव करून देऊन राष्ट्रप्रेमाकडे प्रवृत्त करावयाचे होते. स्वदेश व स्वधर्म याची योग्य जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण करावयाची होती. भारतातील बहुसंख्य जनता ही खेड्यातून व गावातून राहते. तेव्हा गाव हाच खरा देशाचा आत्मा आहे, असे मानून वंदनीय महाराजांनी आपले कार्य ग्रामापासून सुरू केले. त्यांनी केलेले चिंतन हीच 'ग्रामगीता' होय.

'श्रीगुरुदेव' हे नामपद आध्यात्मिक भूमिकेचे द्योतक आहे. ब्रह्मलीन संत श्री आडकुजी महाराज (भूवैकुंठ श्रीक्षेत्र वरखेड) हे वंदनीय महाराजांचे आध्यात्मिक गुरू होते. समाजकार्यासाठी 'सेवा' हेच साधन असते. 'सेवा' हे पद इथे त्या अर्थाने सयुक्तिक आहे. अशा या उदात्त विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी वृत्तपत्रादि माध्यमांची नितांत आवश्यकता असते, हे वंदनीय महाराज जाणून होते. वंदनीय महाराजांनी ज्यावेळेस श्रीगुरुदेव सेवा मंडळाची स्थापना केली, त्यावेळी त्यांच्या प्रभावळीत सुदामजी सावरकर, अं. वा. नवाडे, तुकारामाजी गीताचार्य, रघुनाथराव पत्तरकिने, देवदास वराडपांडे, डी. जी. निकम इत्यादी निष्ठावंत मंडळी होती. गुणग्राहकता हा वंदनीय महाराजांचा विशेष गुण होता. आपल्या निष्ठावंत सहकाऱ्यांमधील काही साहित्यिक प्रतिभावंतांना प्रेरणा देऊन वंदनीय महाराजांनी आपल्या संकल्पित कार्याच्या सुदृढ अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून वृत्तपत्रसृष्टीची कास धरली.



'श्रीगुरुदेव' मासिकाचे अवतरण

वंदनीय राष्ट्रसंतांच्या प्रेरणेने ५ एप्रिल १९४३ रोजी, चैत्र-शुक्ल प्रतिपदा (गुढीपाडवा) या शुभ मुहूर्तावर 'श्रीगुरुदेव' या मासिक पत्राचे प्रकाशन सुरू झाले. लोकशिक्षण, लोकजागृती, लोकोद्धार ही उद्दिष्टे उराशी बाळगून भारताची आध्यात्मिक परंपरा ग्रामोद्धार समाजोद्धार व राष्ट्रोद्धारासाठी वंदनीय महाराजांनी पत्रकारितेचे माध्यम अंगीकारले. या अद्वितीय मासिक पत्रिकेचे आद्य संपादक होते अं. वा. नवाडे. वंदनीय महाराजांनी 'श्रीगुरुदेवा'च्या या स्थापनान्कात प्रारंभी जे 'निवेदन' दिले आहे ते महाराजांना अभिप्रेत असलेल्या पत्रकारितेचे शाश्वत मूल्य सांगणारे आहे. वंदनीय महाराज म्हणतात- 'तेव्हा आजच्या, आमच्या धर्म मानणाऱ्या समाजाची उगीच भूल होऊन त्यांचा उन्नती मार्ग आंधळ्याप्रमाणे 'इधर ना उधर' असा होऊ नये म्हणून, माझी या विश्वातील सर्व सज्जनांना सविनय विनंती आहे की, त्यांनी आपापल्या संप्रदायांतील लोकांत व्यापलेल्या रुढींचा काळोख काढून त्यांना अध्यात्मकारणात आपल्या संसार व परमार्थाची अभेदरूप जोड बसविण्याचा मार्ग निर्लोभपणे सांगावा. याच दृष्टीने लेखरूपाने जनताजनार्दनाची सेवा करावी, एवढीच माझी त्या थोर संतमहंतांना व विद्वानांना नम्र प्रार्थना आहे. एवढ्याचकरिता हा 'श्रीगुरुदेव' मासिकाचा उपक्रम अत्यंत महागाईच्या वेळी वाटेल तसा प्रयत्न करून सुरू केला आहे.' - तुकड्यादास (श्रीगुरुदेव वर्ष १ अंक १ पृ. ४)

वंदनीय महाराजांच्या या आंतरिक विचारांची समर्थ अभिव्यक्ती अं. वा. नवाडे यांनी 'श्रीगुरुदेव'चे अवतारकार्य हे प्रथम संपादकीय लिहून साधली आहे. या अत्यंत समर्पक व सूचक संपादकीयात ते म्हणतात- 'मानवी प्राण्यावर आलेल्या आपत्तीच्या काळी मानवी प्राण्याचे साहस कर्तबगारी याशिवाय त्यास परमेश्वराच्या आश्रयाची आवश्यकता असते. 'सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जे करील तयाचें। परि तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे।।' या समर्थ उक्तीनुसार मनुष्याचे साहस, कर्तबगारी, परमेश्वराच्या आश्रयावर अधिष्ठित असण्याची जितकी आवश्यकता आहे, तितकीच त्यासाठी सद्‌भक्ती प्रचाराची जरूरी आहे. अंधश्रद्धा बुवाबाजी तसेच नास्तिकता नष्ट करून जनतेत सद्‌भक्ती नि खऱ्या धर्माचा प्रचार नि प्रसार करण्याकरिता म्हणजेच जनतेला सद्‌भक्ती नि सद्‌धर्मप्रवण करण्यासाठी वाहून घेणाऱ्या 'श्रीगुरुदेव'सारख्या मासिकाची आजच्या भारताला अत्यंत जरूरी आहे, या विषयी दुमत होईलसे वाटत नाही. श्रीगुरुदेवाच्या कृपेने 'श्रीगुरुदेव' मासिक ही उणीव भरून काढील अशी संचालकांची व आमची अपेक्षा आहे.' (तत्रस्थ पृ

अवकाळीचा तडाखा, टरबूज उत्पादक बीड जिल्ह्यातील शेतकरी संकटात

तभा. वृत्तसेवा

अंबाजोगाई | एकीकडे निसर्गाची अवकृपा आणि दुसरीकडे जागतिक घडामोडींचा परिणाम, अशा दुहेरी कात्रीत बीड जिल्ह्यासह अनेक ठिकाणचा शेतकरी अडकला आहे. अशातच अंबाजोगाई तालुक्यातील पट्टीवडगाव येथील एका प्रयोगशील युवा शेतकऱ्याने पारंपरिक शेतीला फाटा देत टरबूज लागवडीचा यशस्वी प्रयोग केला खरा, मात्र सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीमुळे आणि अवकाळी पावसामुळे या शेतकऱ्याच्या स्वप्नांचा चक्काचूर झाल्याचे दिसून येत आहे.

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातील पट्टीवडगाव येथील प्रवीण पितळे या तरुण शेतकऱ्याने गेल्या दोन वर्षांपासून आपल्या पाच एकर शेतीमध्ये टरबूज लागवडीचा प्रयोग केला होता. सुरुवातीच्या काळात त्यांनी दीड एकरातून चांगला नफा मिळवला होता. सन २०२३ साली दीड एकरात २० टन टरबूजाचे उत्पन्न घेऊन १.८० लाखत १ लाखाचा नफा मिळवला होता. सन २०२४ साली एक एकरात १६ टन उत्पादन घेऊन १ लाखाचा नफा मिळवला. दोन वर्षाचे उत्पन्न व त्यातील यश व नफा पाहून प्रवीण यांनी २०२५ मध्ये जोखीम पत्करून तीन एकरात टरबूज लावले. यासाठी सुमारे ८० हजार रुपये खर्च देखील केला यातून त्यांना ३० टन उत्पादनाची अपेक्षा होती. यातून किमान साडेतीन लाख रुपये मिळतील अशी त्यांची



खात्री होती. मात्र नियतीला काही औरच मान्य असल्याचे चित्र निर्माण झाले.

जागतिक पातळीवर युद्ध सुरू झाले . त्याची झळ संपूर्ण जगातील अनेक देशांना सोसावी लागत आहे. सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्यातीवर परिणाम झाला असून बाजारात टरबूजाचे भाव कोसळले आहेत. त्यातच भर म्हणून जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे हाताशी आलेला माल खराब होत आहे. कष्टाने पिकवलेल्या मालाला योग्य भाव मिळत नसल्याने प्रवीण पितळे यांच्यावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे.

प्रवीण पितळे यांनी अत्यंत उद्वेगाने आपली कैफियत मांडली आहे. ते म्हणतात की,"शासनाकडून वेलवर्गीय पिकांसाठी ना कोणते अनुदान आहे, ना पीक विम्याचे कवच. अशा परिस्थितीत जेव्हा नैसर्गिक किंवा जागतिक संकट येते, तेव्हा शेतकरी पूर्णतः उद्धस्त होतो. याच हतबलतेतून शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतो." यामुळे शासनाने वेलवर्गीय पिकांचा समावेश तातडीने पीक विमा योजनेत करावा. नुकसानग्रस्त टरबूज उत्पादकांना शासनाने विशेष अनुदान द्यावे. अस्मानी संकटात सापडलेल्या बागायतदार शेतकऱ्यांना कर्जमाफी किंवा आर्थिक मदत द्यावी. आता या तरुण शेतकऱ्याची हाक सरकारपर्यंत पोहोचणार का? आणि अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मदतीचा हात मिळणार का? याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

हवामान विभागाने दिलेल्या पूर्वअंदाजानुसार, संपूर्ण राज्यासह बीड जिल्ह्यातही अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. गा अस्मानी संकटामुळे बळीराजाच्या तोंडाचा घास हिरावला गेला असून बीड जिल्ह्यातील शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. प्राथमिक माहितीनुसार, १ एप्रिल रोजी झालेल्या वादळी पावसामुळे जिल्ह्यातील तब्बल २३७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. या नुकसानी सोबतच जनावरे दगावली आहे. बीड जिल्ह्यात मागच्या वर्षी मे महिन्यात अवकाळी पावसामुळे संपूर्ण धरणे तुडूंब भरली होती. यंदा मार्च महिन्यापासूनच अवकाळी पावसाला सुरुवात झाली आहे. रब्बीची पिके काढणी जवळपास पूर्ण झाली आहे. परंतु काढलेल्या पिकांना पावसाचा फटका बसत आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील चार तालुक्यांना या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका बसला आहे. प्रशासनाच्या आकडेवारीनुसार, एकूण १२ गावांमधील ५५४८ शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. अशा एकूण २३७ हेक्टरहून अधिक क्षेत्रावरील पिकांना या अवकाळीचा फटका बसला आहे. हाती आलेले पौक अचानक आलेल्या पावसामुळे खराब झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

मादळमोहीजवळ भरधाव कारने चार वाहनांना उडवले; जीवितहानी टळली



तभा. वृत्तसेवा

बीड, ०५ एप्रिल | गेवराई तालुक्यातील मादळमोही येथे नगर रोडवरील यशराज हॉटेलसमोर एका भरधाव कारने चार वाहनांना जोरदार धडक दिल्याची धक्कादायक घटना घडली. या भीषण अपघातात चारही वाहनांचा अक्षरशः चुराडा झाला असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. पाथर्डी बाजूकडून वेगाने येणाऱ्या एका टाटा कारवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा थरार घडला. या भीषण धडकेत चंद्रकांत आंधळे, शहादेव आंधळे, यादव इंगोले आणि शिगटे यांच्या मालकीच्या वाहनांचे प्रचंड नुकसान झाले आहे. विशाखापट्टणम हायवेवर नेहमीच वर्दळ असते, अशा गजबजलेल्या ठिकाणी चालकाने वेगाचे भान न राखल्याने हा अपघात ओढवला.

घटनेची माहिती मिळताच संदीप आंधळे यांनी पोलिसांना पाचारण केले. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे. वेगाच्या मर्यादेचे उल्लंघन केल्याने निष्पापांच्या मालमत्तेचे मोठे नुकसान झाल्यामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

5 एमव्हीएचा अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर मंजूर

तभा. वृत्तसेवा

बीड, ०५ एप्रिल | केज येथील १३२ केव्ही उपकेंद्रात अतिरिक्त ५ एमव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर दाखल झाला असून, यामुळे वीज पुरवठ्याचा प्रश्न कायमचा मार्गी लागणार आहे. आमदार नमिता मुंदडा यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा प्रकल्प पूर्णत्वास आला असून, यामुळे केज शहरासह तांबवा, पिसेगाव आणि सोनीजवळा परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

वाढत्या विजेच्या मागणीमुळे होणारा ओव्हरलोड आणि वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा आता थांबणार आहे. विशेषतः शेतकऱ्यांना रात्री-अपरात्री पिकांना पाणी देण्यासाठी होणारा त्रास कमी होऊन घरगुती उपकरणेही सुरळीत चालतील. हा ट्रान्सफॉर्मर लवकरच कार्यान्वित केला जाणार असल्याची माहिती आमदार मुंदडा यांनी दिली आहे.

बर्दापूर आरोग्य केंद्रात पाण्याचा डोह; डॉक्टर आणि रुग्णांचे प्रचंड हाल

तभा. वृत्तसेवा

बीड, ०५ एप्रिल | अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत अत्यंत दुरावस्थेत असून अवकाळी पावसामुळे रुग्णालयात अक्षरशः पाण्याचा डोह साचला आहे. या केंद्रांतर्गत २७ गावांतील ५२ हजारांहून अधिक नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी असताना छताला लागलेल्या गळतीमुळे डॉक्टरांना चक्क टेबलवर उभे राहून सेवा द्यावी लागली. रुग्णालयाची इमारत खिळखिळी झाली असून कर्मचारी निवासस्थानेही खंडहर बनली आहेत.

आरोग्य केंद्रातील औषधी आणि गोळ्या पाण्यात भिजल्याने मोठे नुकसान झाले असून परिसरात डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने रुग्णांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. रुग्णवाहिकाही भंगार अवस्थेत असल्याने तातडीच्या उपचारासाठी नागरिकांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे. प्रशासनाच्या या गंभीर दुर्लक्षामुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट असून तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी होत आहे.

अंबाजोगाई आरटीओ कार्यालयाचे लोखंडी सावरगावात स्थलांतर

6 एप्रिलपासून नवीन इमारतीत कामकाज सुरु

बीड, ०५ एप्रिल | अंबाजोगाई येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) आता लोखंडी सावरगाव येथील स्वतःच्या हक्काच्या नवीन सुसज्ज प्रशासकीय इमारतीत स्थलांतरित होत आहे. या नवीन इमारतीमध्ये सोमवार, ६ एप्रिलपासून सर्व कार्यालयीन कामकाज अधिकृतपणे सुरू होणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या कार्यालयाचे काम तात्पुरत्या स्वरूपाच्या जागेतून चालत होते, मात्र आता नवीन हक्काची वास्तू मिळाल्याने कामकाजात मोठी सुधारणा होणार आहे. या आधुनिक प्रशासकीय इमारतीमुळे नागरिकांना आवश्यक सोयीसुविधा एकाच छताखाली उपलब्ध होतील. तसेच वाहन परवाना, नोंदणी आणि इतर तांत्रिक कामे अधिक सुलभ व जलद गतीने पूर्ण होण्यास मदत मिळणार आहे. नव्या जागेतील प्रशस्त परिसरामुळे वाहन तपासणी प्रक्रियेलाही गती येईल. अंबाजोगाई परिसरातील नागरिकांनी या बदलाची नोंद घेऊन ६ एप्रिलपासून आपल्या कामांसाठी लोखंडी सावरगाव येथील नवीन कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

वारकरी संप्रदायाचा वारसा जोपासणे ही काळाची गरज : जयदत्त क्षीरसागर

तभा. वृत्तसेवा

बीड दि.४(प्रतिनिधी): | वारकरी संप्रदायाचा पाया भक्कम असून संतांच्या आशीर्वादाने आज गावोगावी नामस्मरण सुरू आहे. समाज एकत्र आणणे हाच यामागचा मुख्य उद्देश असून, संत तुकाराम महाराजांच्या विचारांवर समाज घडवण्याचे काम वारकरी कुटुंब करत आहेत. आपल्या समृद्ध संस्कृतीचे जतन करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

बीड येथील राधाकृष्ण नगरी भागात आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण



सोहळ्याच्या सांगता प्रसंगी ते बोलत होते. यावेळी ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी नमूद केले की, शक्ती आणि भक्तीची सांगड घालून हनुमानाची आराधना आणि परमेश्वराचे नामस्मरण करणे ही आपली परंपरा आहे. राधाकृष्ण नगरी भागातील नागरिकांना चांगल्या सोयी-सुविधा देण्याचा आमचा कायम प्रयत्न राहिला आहे. विकासाची ही आस आम्ही पूर्ण केली असून, येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिराच्या माध्यमातून धार्मिक कार्यालाही बळ मिळत आहे सध्याच्या काळात वाढत चाललेली 'भोंदूगिरी' आणि समाजाची होणारी दिशाभूल यावर त्यांनी चिंता व्यक्त केली. जर आपण प्रभू श्रीराम आणि हनुमानाचा आदर्श सोडला, तर देव आणि भक्ताचे नाते टिकवणे कठीण होईल, असा इशाराही त्यांनी दिला. या कार्यक्रमाला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राधाकृष्ण नगर भागातील या उत्सवामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून, परिसरातील भाविकांच्या उपस्थिती मध्ये हा सोहळा यशस्वीरित्या पार पडला.

मृदंगमहर्षी पंडित उद्धव बापू आपेगावकर यांना राष्ट्रीय पुरस्कार जाहीर!

तभा. वृत्तसेवा

अंबाजोगाई | भारतीय शास्त्रीय संगीत आणि वारकरी परंपरेचा वारसा जागतिक स्तरावर पोहोचवणारे प्रख्यात पखवाज वादक पंडित उद्धव बापू आपेगावकर यांना १३ व्या 'लोकमत सूर ज्योत्स्ना नॅशनल म्युझिक अवॉर्ड'ने गौरवण्यात येणार आहे. रविवारी, १२ एप्रिल २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे सायंकाळी ६ वाजता आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात हा सन्मान प्रदान केला जाईल. विजय दर्डा यांनी पत्राद्वारे अधिकृतपणे ही घोषणा केली असून पंडित आपेगावकर यांच्या प्रदीर्घ सांगीतिक तपस्येचा हा गौरव ठरणार आहे.



पद्मश्री दिवंगत शंकर बापू आपेगावकर यांचे सुपुत्र आणि पट्टशिष्य असलेल्या पंडित उद्धव बापू यांनी पारंपरिक पखवाज वादनाला फ्युजन संगीतातही मानाचे स्थान मिळवून दिले. लंडनच्या जगप्रसिद्ध ऑपेरा हाऊससह अमेरिका आणि युरोपातील अनेक देशांत त्यांनी आपल्या वादनाची मोहोर उमटवली आहे. स्व. ज्योत्स्ना दर्डा यांच्या स्मृतींना समर्पित या सोहळ्यात प्रख्यात गायक नितीन मुकेश यांची विशेष उपस्थिती लाभणार असून संगीतप्रेमींसाठी ही मोठी पर्वणी असेल.

अवकाळी पावसाचा तडाखा : 10 ते 12 गावांत हाहाकार

तभा. वृत्तसेवा

बीड | ३ एप्रिल रोजी वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार अवकाळी पावसाने बीड तालुक्यातील सुमारे १० ते १२ गावांना जोरदार तडाखा दिला असून, शेतीपिकांसह घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त भागांचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत जाहीर करण्याची मागणी तहसीलदारांकडे करण्यात आली आहे.

तालुक्यातील घाटजवळा, वलीपूर, आंबेसावळी, मन्यारवाडी, मानकुरवाडी, काळेगाव, मैंदा, पोखरी, घाटसावळी, ताडसोन्ना, परभणी केसापुरी, बकरवाडी व बेलवाडी या गावामध्ये अवकाळी पावसामुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः कांदा, गहू, ज्वारी, मका, हरभरा तसेच फळबागा यांना मोठा फटका बसला आहे.

वादळी वाऱ्याच्या जोरदार झोतामुळे घाटजवळा व वलीपूर परिसरातील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांची शेड कोसळली असून, त्यामुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच ताडसोन्ना, वलीपूरसह अनेक गावांमध्ये गायगोठे, दुकाने आणि पत्र्याची घरे यांचेही नुकसान झाले आहे.या अचानक आलेल्या अवकाळी संकटामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून, शासनाने तातडीने नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे करून मदत जाहीर करावी, अशी मागणी पुढे आली आहे. प्रशासनाने त्वरित पाहणी करून नुकसानग्रस्तांना दिलासा देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

ऊसतोड महिलांच्या अनावश्यक गर्भाशय शस्त्रक्रिया रोखण्यासाठी आ. मुंदडांचा पुढाकार

तभा. वृत्तसेवा

बीड, ०५ एप्रिल | महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलमताई गोरे यांच्या अध्यक्षतेखाली गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियांविषयी पुनर्गठित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय समितीची पहिली महत्त्वपूर्ण बैठक पुणे येथे पार पडली. या बैठकीत केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी उपस्थित राहून ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्याशी संबंधित अत्यंत गंभीर आणि संवेदनशील प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. राज्यातील ऊसतोड महिलांच्या अनावश्यक शस्त्रक्रियांवर नियंत्रण मिळवणे आणि त्यांना सुरक्षित आरोग्य सेवा पुरवण्यासाठी शासनाने तातडीने ठोस धोरण राबवावे, अशी आग्रही भूमिका मुंदडा यांनी यावेळी मांडली.



बैठकीदरम्यान ऊसतोड महिलांच्या आरोग्याचे संरक्षण, अनावश्यक शस्त्रक्रियांवर कडक नियंत्रण आणि ग्रामीण भागातील महिलांना योग्य वैद्यकीय मार्गदर्शन मिळवून देण्यासाठी व्यापक जनजागृती करण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. आमदार नमिता मुंदडा यांनी यावेळी स्पष्ट केले की, महिलांचे आरोग्य ही केवळ त्यांची वैयक्तिक जबाबदारी नसून ती संपूर्ण समाजाच्या सर्वांगीण विकासाशी निगडित आहे. प्रत्येक महिलेला सुरक्षित, सन्मानपूर्वक आणि आरोग्यदायी जीवन मिळणे हा त्यांचा हक्क असून, त्यासाठी शासनाने सकारात्मक पावले उचलणे काळाची गरज आहे. या विषयावर प्रभावी धोरण तयार करण्यासाठी काही महत्त्वपूर्ण शिफारशीही समितीमार्फत शासनाला सादर करण्यात आल्या आहेत.

या विशेष बैठकीसाठी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे तज्ज्ञ, बीड जिल्हा रुग्णालयाचे अधिकारी आणि इतर मान्यवर उपस्थित होते. विशेषतः बीड जिल्ह्यातील ऊसतोड महिलांच्या शस्त्रक्रियांच्या प्रश्नावर यापूर्वीही मोठे वादंग निर्माण झाले होते, त्या पार्श्वभूमीवर या समितीची बैठक आणि मुंदडा यांनी मांडलेली भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. महिलांच्या आरोग्याबाबत कोणत्याही प्रकारची तडजोड केली जाऊ नये आणि त्यांना स्थानिक पातळीवरच दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी या बैठकीत ठोस आराखडा तयार करण्यावर भर देण्यात आला.

डॉ. संजय तांदळे बेघर निवारा केंद्रामध्ये अन्नदान करुन केला वाढदिवस साजरा

तभा. वृत्तसेवा

बीड | सालाबादा प्रमाणे याही वर्षी सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांनी दि. ४ एप्रिल २०२६ शनिवार रोजी शहरातील बेघर निवारा केंद्रामध्ये अन्नदान करून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, वसुदेव मिसाळ ,लक्ष्मण चाटे ,प्रा. बाळासाहेब नागरगोजे, डॉ. लक्ष्मण पवळ, बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य,व्यवस्थापक राजू



वंजारे,काळजीवाहक छाया सरोदे सह बेघर निवारा केंद्रातील सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते.

बीडमधील 46 शाळा अनुदानास कायमस्वरूपी अपात्र; शिक्षण विभागाची कारवाई

बीड, ०५ एप्रिल | जिल्ह्यातील खासगी शाळांनी वारंवार संधी देऊनही मुल्यांकन प्रक्रिया पूर्ण न केल्यामुळे राज्य शिक्षण विभागाने ४६ शाळांना अनुदानासाठी कायमस्वरूपी अपात्र ठरवले आहे. यामध्ये १४ प्राथमिक, ७ माध्यमिक आणि २५ उच्च माध्यमिक विद्यालयांचा समावेश असून यामुळे अनुदानाच्या प्रतीक्षेत असलेल्या कर्मचाऱ्यांची मोठी निराशा झाली आहे. अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या निकषापेक्षा कमी असणे, स्वतःची इमारत नसणे आणि अपुऱ्या सुविधा ही प्रमुख कारणे कारवाईसाठी कारणीभूत ठरली आहेत. या यादीत जिल्ह्यातील काही बड्या राजकीय नेत्यांच्या संस्थांचाही समावेश आहे. शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी या शाळांची मान्यता रद्द केली नसली तरी, त्यांना आता ३० एप्रिलपर्यंत 'स्वयंअर्थसहाय्यित' शाळा म्हणून नोंदणी करणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांची मान्यता कायमची रद्द केली जाईल. या निर्णयामुळे आता शाळांचे शुल्क वाढण्याची शक्यता असून सरकारी योजनांचा लाभही विद्यार्थ्यांना मिळणार नाही.

धारूर तालुक्यात निसर्गाचा तांडव; वादळी पावसाने बळीराजाचे कंबरडे मोडले

आंबेवडगाव परिसरात पिकांची धूळधाण; शासनाने तात्काळ हेक्टरी मदत देण्याची मागणी

तभा. वृत्तसेवा

धारूर | प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील आंबेवडगाव परिसरासह सोनिमोहा, चोंडी, गावंदरा आणि धुनकवड या भागात शनिवारी दुपारी निसर्गाचे अक्राळविक्राळ रूप पाहायला मिळाले. सोसाट्याचा वारा आणि अवकाळी पावसाने या संपूर्ण पट्ट्याला अक्षरशः झोडपून काढले असून, यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. विशेषतः काढणीला आलेली ज्वारी आणि उन्हाळी बाजरीची पिके या वादळामुळे जमिनीवर आडवी झाली आहेत. पीक भुईसपाट झाल्यामुळे आता त्याची काढणी कशी करावी, असा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला असून हाता-तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून नेल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.



केवळ तृणधान्येच नव्हे, तर या भागातील फळबागांनाही वादळी वाऱ्याचा मोठा तडाखा बसला आहे. आंबेवडगाव परिसरातील डाळिंब बागांमध्ये फळांची मोठी गळती झाली असून झाडांच्या फांद्या तुटल्याने बागायतदारांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. तसेच आंब्याचा बहरही या वादळात टिकू शकला नाही. या संकटाने शेतकरी पूर्णपणे खचून गेला असून, प्रशासनाने आता कागदी घोडे न नाचवता तातडीने नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत आणि पीडित शेतकऱ्यांना हेक्टरी मदत जाहीर करावी, अशी मागणी गोविंद तिडके, सुशांत घोळवे, बाळासाहेब वाघमोडे आणि नारायण रुद्र या शेतकऱ्यांनी केली आहे. शासनाने याकडे तातडीने लक्ष न दिल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडण्याची भीती व्यक्त होत आहे.

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोनवणे यांची युवक काँग्रेसच्या प्रदेश सचिवपदी फेरनियुक्ती

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.५ एप्रिल -

तालुक्यातील कवठा येथील धीरज सोनवणे यांची महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या सचिवपदी फेरनियुक्ती करण्यात आली आहे. युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांनी ही नियुक्ती जाहीर केली.

धीरज सोनवणे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून निष्ठापूर्वक व प्रामाणिकपणे संघटनात्मक काम करत युवक काँग्रेसमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत प्रदेशाध्यक्षांनी त्यांच्यावर पुन्हा एकदा विश्वास दाखवत ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. सामाजिक क्षेत्रातही त्यांचा सक्रिय सहभाग असून ग्रामीण भागातील युवा उद्योजक म्हणून ते धाराशिव जिल्ह्यात सुपरीचीत आहेत. युवक काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव महेश देशमुख यांचे निकटवर्तीय म्हणूनही त्यांची ओळख आहे.



या फेरनियुक्तीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरातून धीरज सोनवणे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

संक्षिप्त वृत्त...



कळंब बस आगारात भीमजयंती नियोजन बैठक संपन्न

कळंब, दि.५ एप्रिल -

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती उत्सवाच्या नियोजनासाठी कळंब बस आगारात उत्साहपूर्ण बैठक पार पडली. यंदा जयंती उत्सवाची धुरा महिला कर्मचाऱ्यांच्या हाती सोपविण्यात आल्याने विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. बैठकीत कार्यक्रमाचे नियोजन, जबाबदाऱ्या व विविध समि त्यांची रचना यावर चर्चा करण्यात आली. अध्यक्षपदी राजकन्या गवळी, उपाध्यक्षपदी वंदना पालके, सचिवपदी संध्या सोनटक्के, कोषाध्यक्षपदी सरोजा औसेकर व निवेदिता रणदिवे, तर प्रसिद्धी प्रमुखपदी प्रियंका शिंदे व अनुराधा भोसले यांची निवड करण्यात आली. महिला कर्मचाऱ्यांना नेतृत्वाची संधी देत उत्सव अधिक शिस्तबद्ध व सामाजिक संदेश देणारा करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. बैठकीस आगारातील अनेक कर्मचारी उपस्थित होते.



नारंगवाडी शाळेत पाणी संवर्धनाबाबत जनजागृती


उमरगा, दि.५ एप्रिल -

उमरगा तालुक्यातील नारंगवाडीची वाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पाणी संवर्धनाबाबत जनजागृतीपर उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. शाळेच्या परिसरात पाणी वाचवले तरच पृथ्वी वाचेल असा संदेश देणारा फलक लावून ग्रामस्थांना पाणी बचतीचे महत्त्व पटवून देण्यात आले. वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांना पाण्याचा अपव्यय टाळणे, आवश्यक तेवढेच पाणी वापरणे आणि भविष्यातील पिढ्यांसाठी जलसंपत्ती जपण्याचे मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सहशिक्षक उमेश गोटे यांनी आज पाणी जपले नाही तर उद्या जीवन कठीण होईल, असे सांगत जलसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमास मुख्याध्यापकांसह शिवाजी जमादार, प्रकाश राठोड, सुभाष सुरवसे, अंकुश भोसले, अमोल सुरवसे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कल्पना नगरात डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन

कळंब, दि.५ एप्रिल -

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त कल्पना नगर येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त लिंबुनी बौद्ध विहार येथे सामाजिक कार्यकर्ते सतपाल बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक पार पडली. बैठकीत जयंती समितीची निवड करण्यात येऊन अध्यक्षपदी अभिजीत जाधव, उपाध्यक्ष यश बनसोडे तर कोषाध्यक्षपदी अनिकेत कलवरकर यांची निवड करण्यात आली. जयंतीनिमित्त वक्तृत्व, निबंध, सुंदर हस्ताक्षर, सामान्य ज्ञान, स्लो सायकल, धावणे, मुला-मुलींचे नृत्य, संगीत खुर्ची, जोडी संगीत खुर्ची तसेच महिलांसाठी विशेष पैठणचा खेळ अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. बैठकीस बाळासाहेब हौसलमल, मोतीचंद बागरेचा, राजा सय्यद, संदीप सोनवणे, राकेश जगताप, तुषार रणदिवे, दादा खंडागळे, अमित जाधव, विनोद जगताप, वैभव गायकवाड, बुवा वाघमारे, सौरभ गायकवाड, लाला कांबळे, दीपक गायकवाड, नितीन आंगरखे, अनिकेत गायकवाड आदी उपस्थित होते.



कळंब येथे हनुमान जयंतीनिमित्त हरिनाम सप्ताहाची सांगता

कळंब, दि.५ एप्रिल -

कसबा पेठ येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिरात हनुमान जयंतीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता उत्साहात झाली. यावेळी ह.भ.प. ज्ञानसिंधू संदीपान महाराज हसेंगांवकर यांनी काल्याच्या किर्तनातून परमभक्तीमुळे अहंकार नष्ट होऊन भक्त भगवंताशी एकरूप होतो, असे प्रतिपादन केले. संत ज्ञानेश्वरी यांच्या अभंगावर भाष्य करत त्यांनी भगवंताचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच वारकरी संप्रदाय समाजाला योग्य दिशा देणारा असून ढोंगीपणावर संतांनी नेहमीच टीका केल्याचे त्यांनी नमूद केले. २६ मार्च ते २ एप्रिलदरम्यान पार पडलेल्या सप्ताहात शिवपुराण कथा, कीर्तन सेवा, ज्ञानेश्वरी पारायण आदी कार्यक्रम झाले. २ एप्रिल रोजी सूर्योदयाच्या वेळी हनुमान जन्मोत्सव साजरा करून प्रसाद वाटप करण्यात आले. काल्याच्या किर्तनास भाविकांची मोठी उपस्थिती होती.

कळंबमध्ये मोकाट कुत्र्यांची दहशत; न.प.च्या निष्क्रियतेविरोधात संताप

कळंब शहरात मोकाट कुत्र्यांचा वाढता उपद्रव... | चिमुकलीवर हल्ला... | नागरिकांत भीतीचे वातावरण...

तभा वृत्तसेवा
कळंब, दि.५ एप्रिल -

शहरात मोकाट कुत्र्यांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. विविध भागांत कुत्र्यांचे टोळके मुक्तपणे फिरत असल्याने लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच दुचाकीस्वारांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.



आज शहरातील एका गल्लीमध्ये हिंदवी किशोर मोरे या चिमुकलीवर मोकाट कुत्र्याने हल्ला करत तिच्या मांडीला गंभीर चावा घेतला.

जखम इतकी तीव्र होती की लचका तुटल्यासारखी स्थिती निर्माण झाली. तातडीने तिला ग्रामीण रुग्णालयात दाखल करून उपचार करण्यात आले.

ग्रामीण रुग्णालयाच्या माहितीनुसार, कळंब शहर व तालुक्यातून दररोज सरासरी ३० ते ३५ रुग्ण कुत्र्यांच्या चाव्यामुळे उपचारासाठी येत आहेत. ही बाब अत्यंत चिंताजनक मानली जात आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शहरातील जवळपास प्रत्येक गल्लीमध्ये मोकाट कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ही कुत्री लहान मुलांच्या मागे धावतात, दुचाकीस्वारांचा पाठलाग करतात, त्यामुळे अपघातांचाही धोका वाढला आहे.

शाळा, महाविद्यालये, दवाखाने आणि गर्दीच्या ठिकाणीही त्यांचा वावर वाढल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

सुप्रीम कोर्टाने मोकाट कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी स्पष्ट निर्देश दिले असतानाही नगरपरिषद प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. निर्बीजिकरण व पकड म ोहीम प्रभावीपणे राबवली जात नसल्याने नागरिकांमध्ये संताप वाढत आहे.

नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने मोकाट कुत्र्यांवर नियंत्रणासाठी निर्बीजिकरण, पकड मोहीम आणि इतर प्रभावी उपाययोजना राबवण्याची मागणी केली आहे. अन्यथा भविष्यात गंभीर दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी प्रशासनावर राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.

रुग्णालयात सध्या ९१७ लसींचा साठा उपलब्ध असून ए.आर.एस. लसीचे १० पॉकेट उपलब्ध आहेत. त्यामुळे रुग्णांना कोणतीही गैरसोय होणार नाही, असे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नागनाथ धर्माधिकारी यांनी सांगितले.

तसेच कुत्रा चावल्यास विलंब न करता तातडीने रुग्णालयात उपचार घ्यावेत, असे आवाहनही करण्यात आले आहे.

चार दिवसांत ८३ रुग्णांवर उपचार

कळंब येथील उपजिल्हा रुग्णालयात १ ते ४ एप्रिल दरम्यान एकूण ८३ रुग्णांवर कुत्र्यांच्या चाव्यामुळे उपचार करण्यात आले आहेत.

१ एप्रिल : ३३ रुग्ण, २ एप्रिल : १९ रुग्ण, ३ एप्रिल : ७ रुग्ण, ४ एप्रिल : २४ रुग्ण

एमआरपीपेक्षा जादा दराने विक्री; 'कूलिंग चार्ज' नावाखाली ग्राहकांची लूट

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.५ एप्रिल -

उन्हाळ्याच्या तडाख्यात नागरिक थंड पेयांकडे वळत असताना शहरातील काही किराणा दुकानदारांकडून ग्राहकांची सरळ लूट सुरू असल्याचे समोर आले आहे. २० रुपये एमआरपी असलेल्या थनस्प, प्राईट, माझा, सारख्या कोल्ड्रिंक्सच्या बाटल्यांवर 'कूलिंग चार्ज'च्या नावाखाली तब्बल ५ रुपये अधिक आकारून २५ रुपयांना विक्री केली जात आहे.



एमआरपी स्पष्टपणे २० रुपये असतानाही फ्रिजमध्ये थंड केलंय या कारणावरून अतिरिक्त पैसे घेतले जात आहेत. काही ठिकाणी ग्राहकांनी याला विरोध केल्यास दुकानदारांकडून उडवाउडवीची उत्तरे देत विक्रीस नकार देण्याचे प्रकारही घडत आहेत.

ग्राहक संघटनांनी या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त करत म्हटले आहे की, एमआरपीपेक्षा जास्त दराने विक्री करणे हा ग्राहक संरक्षण कायद्याचा सरळ भंग आहे. 'कूलिंग चार्ज' नावाखाली पैसे घेणे पूर्णपणे बेकायदेशीर असून संबंधित दुकानदारांवर कारवाई होणे आवश्यक आहे.

दरम्यान, नागरिकांमध्येही संताप व्यक्त होत असून २० ची बाटली २५ ला का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. प्रशासनाने तात्काळ धडक कारवाई करून अशा दुकानदारांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

जर प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले, तर ग्राहकांची लूट वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे अन्न व औषध प्रशासन तसेच स्थानिक नगरपालिकेने तातडीने तपासणी मोहीम राबवून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

खा. निंबाळकर यांची ब्रह्मकुमारीज केंद्राला सदिच्छा भेट

तभा वृत्तसेवा
लोहारा, दि.५ एप्रिल -

खा. ओम राजेनिंबाळकर यांनी लोहारा शहरातील शिवप्रसाद भवन येथे कार्यरत ब्रह्मकुमारीज आध्यात्मिक केंद्राला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी केंद्रातील शांत, पवित्र व आध्यात्मिक वातावरणाचा अनुभव घेतला.

केंद्राच्या संचालिका सरिता दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या ध्यानसाधना, राजयोग मेडिटेशन, आत्मशांती व सकारात्मक विचारसरणी आदी उपक्रमांची माहिती त्यांनी जाणून घेतली. समाजात नैतिक मूल्ये व आध्यात्मिक जागृती निर्माण करण्याचे कार्य संस्थेमार्फत प्रभावीपणे सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी बोलताना निंबाळकर यांनी आजच्या तणावपूर्ण जीवनशैलीत मानसिक शांतता व



सकारात्मक विचारांची गरज अधोरेखित करत, युवक व महिलांना योग्य जीवनदृष्टी देण्यात अशा केंद्रांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी संस्थेच्या सेवाभावी कार्याचे कौतुक केले. भेटीदरम्यान बाळासाहेब पाटील, अमोल बिराजदार, सुधीर घोडके, पंडित बारगळ, शेखर पाटील, सचिन रसाळ, दीपक पोतदार, अरुण माटे, राजू स्वामी, राजेंद्र सूर्यवंशी, विजयकुमार बडडाळे, प्रेम लांडगे, मधुकर सुरवसे, राम माने, आकाश विरोधे, सुग्रीव माळी, दिलीप सुरवसे, अविनाश भाई, राणी बहिणजी यांसह दैवी परिवार उपस्थित होते.

अवैध मुरूम उत्खनन प्रकरणी मंत्रालयासमोर वाघमारे कुटुंबाचे उपोषण

तभा वृत्तसेवा
कळंब, दि.५ एप्रिल -

तालुक्यातील डिकसळ येथील अवैध गौण खनिज (मुरूम) उत्खनन प्रकरणी सचिन सटवा वाघमारे हे कुटुंबासह मंत्रालयासम ोर बेमुदत उपोषणाला बसले असून, मागण्या मान्य न झाल्याने त्यांनी राज्यपालांकडेही निवेदन सादर केले आहे.

दि.२३ मार्च पासून सुरू असलेल्या या आंदोलनात वाघम रे दांपत्य दोन लहान मुलांसह सहभागी झाले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, डिकसळ (ता. कळंब) येथे झालेल्या अवैध म रूम उत्खननामुळे त्यांच्या शेतीसह सिंचन विहिरीचे मोठे नुकसान झाले आहे. संबंधित प्रकरणात महसूल प्रशासनातील तत्कालीन अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणाम ुळे हे नुकसान झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

वाघमारे यांनी शासनाने तात्काळ दखल घेऊन दोषींवर फौजदारी कारवाई करावी तसेच नुकसानभरपाई वसूल करून द्यावी, अशी मागणी केली आहे.

दोन एकरांत २५ लाखांची कमाई; पंडित कदम यांची द्राक्ष शेती ठरली आदर्श



अनिल आगलावे
धाराशिव, दि.५ एप्रिल -

तुळजापूर तालुक्यातील उमरगा (चि.) येथील शेतकरी पंडित केरबा कदम यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द, मेहनत आणि योग्य नियोजनाच्या जोरावर द्राक्ष शेतीत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अवघ्या दोन एकर क्षेत्रात त्यांनी तब्बल २५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळवत इतर शेतकऱ्यांसमोर आदर्श निर्माण केला आहे.

कदम यांच्या या यशामागे त्यांच्या कुटुंबाची मोठी साथ लाभली. पत्नी निर्मला कदम तसेच मुलं महेश आणि अविनाश यांनी खांद्याला खांदा लावून मेहनत घेतल्यामुळे कमी क्षेत्रातही अधिक उत्पादन घेणे शक्य झाले.

प्रतिकूल परिस्थितीतही न डगमगता सातत्यपूर्ण कष्ट आणि योग्य नियोजनाच्या बळावर कदम यांनी द्राक्ष बाग फुलवली. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांनी उत्पादनाची गुणवत्ता आणि प्रमाण दोन्ही वाढवले, त्यामुळे बाजारपेठेत त्यांच्या द्राक्षांना चांगला दर मिळाला.

जिद्द, मेहनत, सातत्य आणि स्वतःवर विश्वास ठेवला तर कोणतेही अशक्य काम शक्य होते. कुटुंबाची साथ असेल तर यश नक्की मिळते, असा संदेश पंडित कदम यांनी दिला.

त्यांची ही यशोगाथा इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून, कमी क्षेत्रातही योग्य नियोजन आणि मेहनतीच्या जोरावर भरघोस उत्पन्न मिळवता येते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे.

यशाची ठळक वैशिष्ट्ये...

एकूण क्षेत्र : २ एकर
उत्पादन : सुमारे ३३ टन द्राक्षे
विक्री दर : प्रति किलो ८० रुपये
एकूण उत्पन्न : अंदाजे २५ लाख रुपये
बाजारपेठ : हैद्राबाद व कोलकाता



येडशी येथे ५० वर्षांनंतर सोमयाग यज्ञ संपन्न; भाविकांची मोठी गर्दी

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.५ एप्रिल -

तालुक्यातील येडशी येथील रामलिंग तीर्थक्षेत्र परिसरातील श्री रामेश्वर देवस्थान येथे २९ मार्च ते ३ एप्रिल दरम्यान अत्यग्निष्टोम सोमयाग यज्ञ पार पडला. तब्बल ५० वर्षांनंतर आयोजित यज्ञामुळे भाविकांची मोठी गर्दी उसळली.

या यज्ञाचे आयोजन भीष्म फाउंडेशन स्कूल ऑफ इंडियन नॉलेज सिस्टीम, पुणे व विश्व मंदिर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. विश्वकल्याण, पर्यावरण शुद्धीकरण व पंचम हाभूतांचे संतुलन साधण्यासाठी हा यज्ञ आयोजित केल्याचे सांगण्यात आले.

यज्ञाचा शुभारंभ धाराशिवच्या नगराध्यक्षा नेहा काकडे यांच्या हस्ते झाला. तसेच वाराणसी व अयोध्या येथील वेदपंडितांसह १०८ ब्राह्मणांचा सहभाग होता. मुख्य प्रवर्तक प्रा. क्षितिज पाटुकले यांनी २०२६ ते २०३५ दरम्यान १०८ सोमयाग यज्ञ करण्याचा संकल्प व्यक्त केला.

३ एप्रिल रोजी यज्ञाची सांगता झाली. यावेळी आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी यज्ञस्थळी भेट देऊन दर्शन घेतले व महाप्रसादाचा लाभ घेतला.

भाजपाचे वाढते वर्चस्व : संघटनबळ आणि विकासाच्या जोरावर जिल्हा प्रगतीपथावर!

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.५ एप्रिल -

भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त जिल्हाभरात उत्साहाचे वातावरण असून, भाजपाचे वाढते वर्चस्व, सक्षम संघटनबळ आणि विकासाभिमुख धोरणांमुळे जिल्हा प्रगतीच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

धाराशिव जिल्ह्यात भाजपाकडे १ आमदार, जिल्हा परिषद अध्यक्षपद, दोन पंचायत समिती सभापती, चार नगराध्यक्ष तसेच जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य आणि नगरसेवकांची लक्षणीय संख्या आहे.

या एकत्रित बळावर जिल्ह्यात पक्षाची पकड अधिक मजबूत होत आहे. ग्रामीण ते शहरी पातळीवर भाजपाने आपले जाळे विस्तारत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये उल्लेखनीय यश मिळवले आहे.

जिल्ह्यात आम दार राणाजगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची घोडदौड सुरू असून, परंडा तालुक्यातील माजी आमदार सुजीतसिंह ठाकूर आणि उमरगा तालुक्यातील माजी मंत्री बसवराज पाटील यांचेही पक्षवाढीसाठी योगदान महत्त्वाचे ठरत आहे. धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या संघटन कौशल्यामुळे बूथ स्तरापर्यंत कार्यकर्त्यांचे जाळे बळकट झाले आहे.

केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून जिल्ह्यात विविध विकासकामांना गती मिळत आहे. रेल्वे प्रकल्प, रस्ते विकास, आरोग्य सुविधा, सौर व पवनऊर्जा प्रकल्प,

भाजपा पक्षाची ताकद वाढतेय...

जिल्ह्यात भाजपाची संघटनात्मक ताकद दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. बूथ स्तरापासून ते जिल्हा पातळीपर्यंत कार्यकर्त्यांचे जाळे मजबूत झाले असून, नवीन कार्यकर्त्यांचा सहभाग आणि जनतेशी वाढलेला संपर्क यामुळे पक्ष अधिक बळकट होत आहे.



पाणीपुरवठा योजना, जलसंधारण, शिक्षण आणि सिंचन क्षेत्रात म ोठ्या प्रमाणावर कामे सुरू आहेत. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, जल जीवन मिशन यांसारख्या योजनांम ुळे गावागावांत विकास पोहोचत असून नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल होत आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे धाराशिव जिल्ह्याकडे विशेष लक्ष असल्याचे मानले जाते.

विविध प्रकल्पांना मंजुरी, निधी उपलब्धता आणि प्रशासनाला दिलेले मार्गदर्शन यामुळे विकासकामांना वेग आला आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यातील समन्वयातून योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे.

स्थापना दिनानिमित्त जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून कार्यकर्त्यांम ध्ये उत्साहाचे वातावरण आहे. विकास आणि संघटन या दुहेरी बळावर आगामी काळात अधिक व्यापक काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात येत आहे.

आमदार राणादादांचे राजकीय कौशल्य...

धाराशिव जिल्ह्यातील राजकीय घडामोडींमध्ये आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे नेतृत्व ठळकपणे जाणवत आहे. स्थानिक प्रश्नांची अचूक जाण, कार्यकर्त्यांशी सातत्यपूर्ण संवाद आणि प्रशासनाशी प्रभावी समन्वय साधण्याची क्षमता यामुळे त्यांच्या नेतृत्वाचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी असलेली जवळीकही जिल्ह्याच्या विकासासाठी पूरक ठरत असल्याचे मानले जाते.

तीर्थक्षेत्र विकासातून रोजगाराच्या संधी...

धाराशिव जिल्ह्यातील तीर्थक्षेत्रांच्या विकासाला गती मिळत आहे. मंदिर परिसर सुशोभीकरण, रस्ते, निवास व्यवस्था, पाणी व स्वच्छता सुविधा यामुळे धार्मिक पर्यटनाला चालना मिळत आहे. यामुळे हॉटेल, प्रवास, मार्गदर्शक सेवा, प्रसाद विक्री आदी क्षेत्रांत रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत असून, स्थानिक तरुणाईसाठी हा विकास महत्त्वपूर्ण ठरत आहे.

CMYK

धाराशिव
जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सुरतगावात मारहाण व सोन्याची अंगठी लुटल्याप्रकरणी सहा जणांवर गुन्हा

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.५ एप्रिल -

सुरतगाव येथे जुन्या वादातून एका तरुणावर धारदार शस्त्रांनी हल्ला करून जखमी करत त्याची सोन्याची अंगठी लुटल्याची घटना घडली आहे.

या प्रकरणी सहा जणांसह अन्य व्यक्तींविरुद्ध तामलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी सुमारे ९.४५ वाजता नानासाहेब गुंड यांच्या घरासमोर सुरतगाव येथे फिर्यादी स्वप्निल ब्रम्हानंद काळे (वय २७) यांना तू आमच्या भांडणाबाबत वडिलांना का सांगितले या कारणावरून आरोपींनी जाब विचारला.

त्यानंतर आरोपी किरण कुबेर मगर, राम कोंडीबा गुंड, महेश बाबू गुंड, गणेश बाळू गुंड, ऋषीकेश महादेव गुंड, श्रीकांत गुंड (सर्व रा. सुरतगाव) तसेच इतरांनी एकत्र येत शिवीगाळ केली.

यानंतर लाथाबुक्क्यांनी मारहाण करत लोखंडी कोयता, हातोडा, लोखंडी सळई व काठीने हल्ला करून फिर्यादीस जखमी करण्यात आले.

यावेळी फिर्यादीच्या हातातील सोन्याची अंगठी काढून घेतली.

तसेच त्यांच्या मित्रालाही मारहाण करून जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

पंडित दिनदयाळ उपाध्याय निवासी प्रशिक्षण महाअभियान उत्साहात



तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.५ एप्रिल -

भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांची निर्मिती व्हावी या उद्देशाने पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६ चे आयोजन संपूर्ण धाराशिव जिल्ह्यामध्ये आमदार राणाजगजीतसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर तसेच माजी मंत्री बसवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडत आहेत. जिल्यातील संघटनात्मक १९ मंडळा पैकी १२ मंडळांमध्ये प्रमुख कार्यकर्त्यांचे दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षण वर्गास १२ मंडळातून सुमारे १६८० हून अधिक जेष्ठ, युवा, महिला भगिनी प्रशिक्षित झाल्या आहेत. या वर्गांमध्ये वैचारिक अधिष्ठान, भारतीय जनता पार्टीचा इतिहास आणि विस्तार, पक्ष संघटन विस्ताराची दृष्टी, पक्षाची कार्यपद्धती, आपल्या सरकारची कामगिरी, सोशल मीडिया आणि ख तसेच नमो प आणि सरल प, बूथ व्यवस्थापन, मन की बात या विषयांवर सत्रांचे आयोजन करण्यात येत आहे.

सदर प्रशिक्षण महाअभियाना म ध्ये १९ मंडळापैकी १२ मंडळामध्ये शिबिरांचे आयोजन यशस्वीरीत्या पार पडले असून मंडलांमधील वर्गांचे पण लवकरच पूर्ण होणार असल्याचे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी सांगितले.

अत्यावश्यक असलेल्या तुळजापूर नळदुर्ग रस्त्यावरील गतिरोधक बसवण्याचे काम अखेर सुरु

नेहमीच होणाऱ्या छोट्या मोठ्या अपघातांना बसणार आळा...



तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.५ एप्रिल -

येथील जास्त रहदारीचा तुळजापूर नळदुर्ग या महामार्ग रस्त्यावर नगरसेवकांच्या निवेदनाची दखल घेवून अखेर गतिरोधक बसवण्याचे काम सुरू करण्यात आल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे.

शहरातील सर्वात जास्त गर्दी या रस्त्यावर असते. या रस्त्यावर होत असल्याने छोटे-मोठे अपघात नेहमीच घडतात गतिरोधक केल्यामुळे या छोट्या-मोठ्या अपघातांवर आळा बसल्याचे नागरिकांमधून चर्चा होत आहे. गतिरोधक केल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे. पूर्वीपेक्षा रस्ता चांगला झाल्यामुळे या रस्त्यावर वाहनधारक हाय स्पीडने गाड्या चालवतात तसेच सकाळ आणि संध्याकाळ पायी फिरायला जाणाऱ्या नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन व महामार्गावर असलेल्या नियमाची दखल घेऊन नागरिकांच्या जीवितेचा धोका लक्षात घेता या रस्त्यावर गतिरोधक करणे अत्यावश्यक होते.

तुळजापूर नळदुर्ग या रस्त्याचे नव्याने रुंदीकरणासह काम झालेले असून या रस्त्यावर अभियांत्रिकी

महाविद्यालय, नवोदय विद्यालय, सैनिक स्कूल, आयटीआय या शैक्षणिक संस्था आहेत तसेच राष्ट्रीयकृत . सहकारी बँका. पतसंस्था सह विविध शासकीय कार्यालय आणि नव्याने झालेले कोर्ट यामुळे दररोज विद्यार्थ्यांसह हजारो लोकांची वर्दळ दैनंदिन कामासाठी या रस्त्यावर असते.परंतु नवीन झालेल्या रस्त्याच्या कामामुळे वाहतूक ही मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे .तसेच पूर्वी रस्त्यावर असलेले गतिरोधक नव्याने झालेल्या या मार्गावर तांत्रिक बाबीमुळे नसल्याने वाहने सुसाट वेगाने धावत आहेत. यामुळे दररोज या रस्त्यावर छोटे मोठे अपघात वारंवार होत असल्याने व नागरिकांची मागणी लक्षात घेऊन उपनगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी व नगरसेविका अश्विनी विशाल रोचकरी यांनी या रस्त्यावर गतिरोधक बसवण्याची मागणी कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग सोलापूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केलेली होती व सतत याचा पाठपुरावा आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्याकडे केला.यामुळे सततच्या पाठपुरावा व नागरिकांच्या मागणीमुळे संबंधित प्रशासनाने या रस्त्यावर गतिरोधक बसवण्याचे काम सुरू केलेले आहे.याविषयी बोलताना उपनगराध्यक्ष रोचकरी यांनी समाधान व्यक्त करून सांगितले की अधिकाऱ्यांची सकारात्मक भूमिकेमुळे व आमदार पाटील यांच्या प्रयत्नमुळे काम सुरू झाले असून या कामामुळे अपघाताला आळा बसेल.

भरधाव कारची दुचाकीला धडक; एकजण ठार

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.५ एप्रिल -

ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या अपघातात मंगरुळ (ता. कळंब) येथील पवन राजू जाधव (वय ३३) यांचा मृत्यू झाला आहे. निष्काळजीपणे कार चालवून दुचाकीला धडक देत अपघात घडविल्याप्रकरणी संबंधित कार चालकाविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.२४ मार्च रोजी सायंकाळी सुमारे ४.४५ वाजण्याच्या सुमारास पवन जाधव हे मोटरसायकल (क्र. एम चएच २५ वाय ३७१३) वरून जात असताना, बावी येथील आश्रम शाळेजवळील राधिका हॉटेल ॲण्ड लॉज परिसरात कार (क्र. एमचएच १२ एफवाय ३९३१) चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवत त्यांच्या दुचाकीला मागून जोराची धडक दिली. या भीषण अपघातात पवन जाधव गंभीर जखमी झाले व त्यांचा मृत्यू झाला.

धाराशिवात वाहतूक नियमभंगावर कारवाई

धाराशिव, दि.५ एप्रिल -

शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांकडून दि.३ एप्रिल रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर वाहतूक नियमभंग करणाऱ्यांवर धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या एकूण ९५ प्रकरणांवर कारवाई करण्यात आली.

तुळजापूरात अनधिकृत बॅनरचा सुळसुळाट; सौंदर्याला धक्का, अपघातांचा धोका वाढला

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.५ एप्रिल -

शहरात अनधिकृत बॅनर लावण्याचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढले असून, त्यामुळे शहराच्या सौंदर्यावर विपरीत परिणाम होत आहे. विशेषतः श्री तुळजाभवानी मंदिर येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसमोर शहराची नकारात्मक प्रतिमा निर्माण होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

राष्ट्रवादीचे नेते बबनराव गावडे यांनी सोशल मीडियावरील पोस्टद्वारे हे बॅनर तातडीने हटवून संबंधितांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

नळदुर्ग रोड, धाराशिव रोडसह प्रमुख मार्गांवरील डिव्हायडरवरील पथदिव्यांच्या खांबांवर कोणतीही परवानगी न घेता बॅनर लावले जात आहेत. धक्कादायक बाब म्हणजे एका खांबावर तीन ते चार बॅनर थरावर थर लावले जात असल्याचे दिसून येत आहे.

त्यामुळे रस्त्यावरील दृश्य झाकले जात असून वाहनचालकांना समोरील मार्ग स्पष्ट दिसत नाही.

विशेषतः रात्रीच्या वेळी व वळणाच्या ठिकाणी ही समस्या अधिक गंभीर बनत असून अपघाताचा धोका



वाढला आहे. तसेच वाऱ्यामुळे बॅनर सैल होऊन खाली पडण्याच्या घटनाही घडत आहेत. काही दिवसांपूर्वी बॅनर कोसळल्याची घटना घडली होती, सुदैवाने जीवितहानी टळली असली तरी नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. नियमांचे उल्लंघन करून बॅनर लावण्यावर तात्काळ अंकुश ठेवण्याची गरज व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर तुळजापूर नगरपरिषद प्रशासनाने त्वरित कारवाई करून अनधिकृत बॅनर हटवावेत तसेच संबंधितांवर कडक दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

तुळजापुरात हरिनाम संकीर्तन उत्साहात संपन्न



तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.५ एप्रिल -

आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ व हरे कृष्ण भक्त तुळ जापूर यांच्या वतीने शहरात भव्य असे हरिनाम संकीर्तन काढण्यात आले.

सकाळी ७ वा. श्री डुल्या मारुती येथून संकीर्तनास प्रारंभ करण्यात येऊन श्री माणिक कदम यांच्या निवासस्थानी सांगता करण्यात आली. कर्ताल-मृदंगाच्या गजरात सर्वजण हरिनामात दंग झाले होते.

कलियुगात हरिनाम हा सर्वांचा धर्म असून हरिनामानेच अनेक जन्मांची पापे जळून जातात. म्हणून सर्वांनी आवडीने सतत हरिनाम घ्यावे असे प्रभूजींनी सांगितले. उन्हाचा पारा वाढत असतानाही, आपल्या लाडक्या भगवंतांच्या नामस्मरणात तल्लीन होण्यासाठी भाविकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद प्रकर्षाने जाणवत होता. बाहेर गावाहून आलेले देवी भक्तही हरिनामात दंगून जाताना दिसत होते. एकंदरीत श्रीराम फेरी उत्साही वातावरणात पार पडली. माणिक कदम प्रभूजी यांनी सर्वांसाठी प्रसादाची व्यवस्था केली होती.

अशी श्रीराम फेरी प्रत्येक महिन्यातील पहिल्या रविवारी काढण्यात येत असून गेल्या तीन वर्षापासून अविरत सेवा चालू आहे.

नळदुर्गात प्रेमनाथ महाराज दिंडीचे जल्लोषात स्वागत



शंभर वर्षांची परंपरा आजही कायम...

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.५ एप्रिल -

माडज येथील संत प्रेमनाथ महाराजांच्या दिंडीचे नळदुर्ग शहरातील मराठा गल्ली येथे यंदाही उत्साहात स्वागत करण्यात आले. तब्बल शंभर वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा आजही तेवढ्याच श्रद्धा आणि भक्तिभावाने जपली जात असल्याचे चित्र पाहायला मिळाले.



दरवर्षी चैत्र महिन्यात पंढरपूरची चैत्रवारी पूर्ण झाल्यानंतर प्रेमनाथ महाराजांची दिंडी माडजकडे परतीच्या प्रवासाला निघते. त्यावेळी नळदुर्ग येथील मराठा गल्ली येथे या दिंडीचा मुक्काम असतो. यंदा ४ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता टाळ-मृदंगाच्या गजरात आणि भजनांच्या सुरेल वातावरणात दिंडीचे आगमन झाले.

या दिंडीचा इतिहास शंभर वर्षांहून अधिक जुना आहे. पूर्वी ही दिंडी नळदुर्गजवळील आलियाबाद येथील हनुमान मंदिरात मुक्काम करत असे. मात्र मराठा गल्लीतील वारकरी संप्रदायाचे कै. गोपीनाथराव मुळे यांच्या विनंतीनंतर ही दिंडी मराठा गल्ली येथे येऊ लागली आणि तेव्हापासून ही परंपरा अखंड सुरू आहे. दिंडीत पालखीत प्रेम नाथ महाराजांची मूर्ती विराजमान असते. टाळ-मृदंग, हलगी आणि भजनांच्या गजरात दिंडी मजल दरमजल करत नळदुर्गमध्ये पोहोचते. आगमनावेळी स्थानिक तरुण हलगीच्या तालावर दिंडीचे स्वागत करून तिला मराठा गल्लीपर्यंत सन्मानाने घेऊन येतात. दिंडी प्रमुख ह.भ.प. श्री काळे महाराज यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. गेल्या काही वर्षांपासून कुरुक्षेत्र किल्लेदार आणि स्थानिक युवक दिंडीच्या संपूर्ण व्यवस्थेची जबाबदारी सांभाळत आहेत.

भोजनानंतर रात्री उशिरापर्यंत भजनाचा कार्यक्रम रंगतो. पहाटे ५ वाजता दिंडी माडजकडे प्रस्थान करते. दिंडीला सुखरूप निरोप देण्यासाठी युवक राष्ट्रीय महामार्गापर्यंत सोबत करतात.

३९ लिटर गावठी दारूसह आरोपी ताब्यात

तभा वृत्तसेवा
मुरूम, दि.५ एप्रिल -

मुरुम पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध मद्य विक्रीविरोधात कारवाई करत पोलिसांनी ३९ लिटर गावठी दारू जप्त केली आहे. या प्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मुरुम पोलिसांची कारवाई

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी रमेश रामचंद्र राठोड (वय ४२, रा. आलूर, ता. उमरगा, जि. धाराशिव) याने दि. ३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६.३० वाजता आलूर येथे अंदाजे ३,९०० रुपयांच्या किमतीची ३९ लिटर गावठी दारू अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली आढळून आली. या कारवाईत पोलिसांनी सदर दारू जप्त केली असून आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

एकल महिलांसाठी मार्गदर्शन मेळावा; योजनांच्या लाभासाठी पुढाकार

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.५ एप्रिल -

साऊ एकल महिला पुनर्वसन समितीच्या वतीने एकल महिलांसाठी विशेष मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. मेळाव्यात विविध शासकीय योजनांची माहिती देत महिलांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

या मेळाव्यात बाल संगोपन, संजय गांधी निराधार, वृद्धापकाळ, श्रावण बाळ तसेच दिव्यांग योजनांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. जिल्हा समन्वयक विजय (काका) जाधव यांनी सांगितले की, आई किंवा वडील गमावलेल्या ० ते १८ वयोगटातील बालकांसाठी शासनाकडून दरमहा २,२५० रुपयांचा लाभ दिला जातो. मात्र अनेक लाभार्थ्यांना अर्ज करूनही दोन वर्षांनंतरही लाभ मिळालेला नसल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली.

यासंदर्भात लाभार्थ्यांची नावे व आधार तपशील संकलित करून एक्सेल फाईल तयार



केली जात असून, ती पुणे आयुक्तालयाकडे सादर करून पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. या नोंदणीसाठी पुणे, लातूर व उदगीर येथूनही महिला उपस्थित होत्या.

मेळाव्यात महिलांना स्वावलंबी होण्यासाठी उद्योग-व्यवसाय सुरू करण्याचे आवाहन करण्यात आले. जिल्हा उद्योग केंद्रामार्फत प्रशिक्षण घेतलेल्या महिलांना ऑनलाईन अर्जाद्वारे बँकांच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य मिळवून दिले जाईल, अशी माहिती देण्यात आली. या कार्यक्रमाला ६८ एकल महिलांची उपस्थिती होती. परित्यक्ता महिलांनी शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी न्यायालयीन घटस्फोट प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. कार्यक्रमास तालुकाध्यक्ष काशीनाथ पाटील, विठ्ठल चिकूंद्रे, गौरी पंडित, ज्योती राजपूत, बबीता गुरव, ज्योती माने, सोनाली करपे, स्मिता जगदाळे यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या.

दरम्यान, २०२१ मध्ये समितीमार्फत शिलाई मशीन मिळालेल्या सात महिलांनी शिवणकामातून स्वावलंबन साधल्याचे सांगत समितीचे आभार मानले.

पुढील मेळाव्यात वंचित महिलांनी सहभागी होऊन योजनांचा लाभ घ्यावा व दलालांच्या फसवणुकीपासून दूर राहावे, असे आवाहन करण्यात आले. काही महिलांच्या पेन्शन बंद झाल्याच्या तक्रारींची दखल घेत, ई-आधार, आधार सीडिंग पावती व बँक पासबुकसह तहसील कार्यालयात प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

समितीमार्फत लाभ मिळेपर्यंत पाठपुरावा केला जाणार असल्याचेही सांगण्यात आले.

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

उदगीर ग्रामीणचा पदभार अशोक अनंत्रे यांच्याकडे

तभा वृत्तसेवा

उदगीर, दि. ०५ एप्रिल : ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी यांच्याविरुद्ध उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यातच लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्ह्यामध्ये पो. नि. पुजारी यांना अटक करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या आदेशाने लातूर येथील भरोसा सेलचे पोलीस निरीक्षक अशोक अनंत्रे यांच्याकडे उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याचा तात्पुरता पदभार देण्यात आला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळ्यात गुरुवारी (दि. २) ग्रामीण पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी व शहर पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार राहुल नागरगोजे अडकले. लाच प्रकरणात या दोघांना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे. तर पोलीस निरीक्षक पुजारी व पोलीस हवालदार नागरगोजे हे दोघे न्यायालयाच्या आदेशानुसार दोन दिवसांच्या पोलीस कोठडीत आहेत. लाच प्रकरणात पोलीस निरीक्षक पुजारी व पोलीस हवालदार नागरगोजे यांचे निलंबन होण्याची शक्यता आहे. उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याचा तात्पुरता पदभार लातूर येथील भरोसा सेलचे पोलीस निरीक्षक अशोक आबासाहेब अनंत्रे यांच्याकडे देण्यात आला आहे. तर शुक्रवारी रात्रीच पोलीस निरीक्षक अनंत्रे यांनी उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याचा पदभार घेतला आहे.

विविध वृत्त...

हिंदी चित्रपटासाठी लातुरात ऑडिशन

तभा वृत्तसेवा

लातूर : लातूर येथील शिवाजी माध्यमिक विद्यालयात दि. ३१ मार्च रोजी भीम के लख्ते जिगर या आगामी हिंदी चित्रपटासाठी भव्य ऑडिशनचे आयोजन करण्यात आले होते. या ऑडिशनला स्थानिक कलाकारांसह ग्रामीण भागातील कलाकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या ऑडिशनमध्ये जिल्हाभरातून सुमारे १५० ते २०० इच्छुक कलाकारांनी सहभाग नोदवला होता. त्यापैकी १२ कलाकारांची हिंदी चित्रपटासाठी निवड करण्यात आली. नवोदित कलाकारांना मोठ्या पडद्यावर काम करण्याची संधी मिळाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या चित्रपटाचे लेखक, निर्माता व दिग्दर्शक विलास गाडगे यांनी स्वतः उपस्थित राहून ऑडिशन घेतले

व कलाकारांची निवड केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण प्रक्रिया पार पडली. या कार्यक्रमाचे आयोजन प्रभाद गौतम व शिवाजी कोंडमगिरे रेड्डी यांनी केले होते. त्यांच्या नियोजनामुळे ऑडिशन यशस्वीरीत्या पूर्ण झाले.

तसेच, शिवाजी माध्यमिक विद्यालयाचे संस्था सचिव अजय जाधव, मुख्याध्यापक ज्योत्सना पाटील व प्रशासकिय अधिकारी अशोक तोगरे या उपक्रमासाठी विशेष सहकार्य केले. त्यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम अधिक प्रभावी ठरला. स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या. भीम के लख्ते जिगर हा हिंदी चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, स्थानिक कलाकारांना मोठी संधी देणारा ठरणार असल्याचे सांगण्यात आले.

३८३ गुन्ह्यात ५ कोटी ४० लाखांचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा

लातूर : नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षाअखेर जिल्हा पोलिसांच्या वतीने ठिकठिकाणी विविध अवैध व्यवसायांवर धाडी टाकण्यात आल्या. २० कारवाया करून ३८३ जणांवर गुन्हे दाखल करून ५ कोटी ४० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

यात अवैध दारू विक्री व गावठी दारूनिर्मितीबाबत २५७ गुन्हे नोंदवून १२ लाख ८१ हजार ७८५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जुगार विरोधी ७७ कारवायांतून २९ लाख ८३ हजार ९६०

रुपये जप्त करण्यात आले आहेत. अंमली पदार्थांविरोधात कारवाई करताना गांजाप्रकरणी १ गुन्हा दाखल करून ५ लाख २२ हजार ७५ रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोग्यास अत्यंत घातक ठरणाऱ्या प्रतिबंधित पदार्थांविरोधातही पोलिसांनी कठोर भूमिका घेत गुटखा तस्करीविरोधात २० गुन्हे नोंदवून तब्बल ६६ लाख ८८ हजार ३४५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याशिवाय अवैध वाळू उपसा व वाहतूक प्रकरणी १५ गुन्ह्यांमध्ये ४ कोटी २६ लाख ७ हजार ५००

रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकणाऱ्या बेकायदेशीर शस्त्र साठ्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आर्म ॲक्ट अंतर्गत १३ गुन्हे नोंदवून प्रभावी कारवाई करण्यात आली. या कारवायांमध्ये स्थानिक गुन्हे शाखेने मोलाची भूमिका बजावली. स्थानिक गुन्हे शाखेने स्वतंत्रपणे केलेल्या कारवायांमध्ये दारू विषयक १८ गुन्हे दाखल करून २ लाख ६५ हजार ८८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

वाढत्या तापमानामुळे माठांना मागणी वाढली

तभा वृत्तसेवा

लातूर : लोक घर आणि पिण्याचं पाणी कसं थंड ठेवता येईल याचा विचार करतात. या दिवसात थंड पाणी शरीराला खूप आराम देतं. पण ते थंड पाणी फ्रीजमधील आहे की अजून कोणतं हेही तितकंच महत्व.ां आहे. उन्हाळ्यात बहूतांश लोक मातीच्या माठातील थंड पाणी पिण्यावर अधिक भर देतात. या पाण्याचे अनेक फायदेही सांगितले जातात. त्यामुळे वाढत्या तापमानामुळे मातीच्या माठांना मागणी वाढली आहे.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी लातूर शहरातील चंद्रनगरमधील राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या मागील नांदेड रोडवर याही वर्षी मातीच्या माठांची अनेक दुकाने थाटली आहेत. पुर्वी प्रमाणे आजघडीला लातूर शहरात कुंभार आणि कुंभाराच्या भट्ट्या नसल्या तरी माठ विक्रीचा व्यवसाय करणारे मात्र आहेत. लातूर जिल्ह्यातून मातीचे माठ आणुन येथे विक्रीस उपलब्ध करण्यात आलेले आहेत. काळ्या मातीच्या माठांना सर्वाधिक पसंती आहे. हे माठ ३०० रुपयांपासून ते ३५० रुपयांपर्यंत विकले जात आहेत. माठ, रांजन, सुरई तसेच राजस्थानी लाल मातीचे माठ, सुरई बाजार पेठेत विक्रीस आल्या आहेत. वाढत्या तापमानामुळे या माठांना ब-यापैकी मागणी आहे.

माठातील पाणी पिण्याने शरीराचे तापमान नियंत्रित राहते, तसेच पचनास मदत होते. मातीतील नैसर्गिक प्रक्रियेमुळे हे पाणी फ्रिजपेक्षा जास्त थंड आणि आरोग्यदायी राहते. माठ नियमितपणे स्वच्छ करणे, पाणी रोज बदलणे आणि माठ झाकून ठेवणे आवश्यक आहे, असे सांगीतले जाते. माठ स्वच्छ करण्यासाठी फिटकरीचा वापर करणे आणि माठ ओलसर कापडाने गुंडाळणे हे उपाय पाणी थंड ठेवण्यासाठी केले जातात. माठातील पाणी पिणे हे फ्रिजच्या थंड पाण्यापेक्षा अधिक आरोग्यदायी आणि सुरक्षित मानले जाते. या कारणांनी मातीच्या माठांना मागणी वाढली आहे.

क्रीडांगणावरील संघर्ष जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्यास बळ देतो : प्रेरणा होनराव

'विश्वमैदान क्रीडा महोत्सव २०२६' बक्षीस वितरण समारंभ उत्साहात

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ०५ एप्रिल : आयुष्यात यशासोबत अपयशाचाही सामना करावा लागतो; मात्र पराभवानंतर खचून न जाता नव्या जिद्दीने पुन्हा उभे राहण्याची प्रेरणा खेळातून मिळते. शिक्षण आणि क्रीडा या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून, क्रीडांगणावरील संघर्ष विद्यार्थ्यांना जीवनातील विविध आव्हानांना समर्थपणे सामोरे जाण्याची ताकद देतो, असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश प्रवक्त्या तथा नगरसेविका प्रेरणा होनराव यांनी केले.



माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाच्या वतीने आयोजित 'विश्वमैदान २०२६' या आंतर महाविद्यालयीन क्रीडा महोत्सवाच्या बक्षीस वितरण समारंभात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, कर्करोग शल्य चिकित्सक डॉ. ब्रिजमोहन झंवर, भूल तज्ज्ञ डॉ. आरती झंवर, एमयूएचएस उपकेंद्राचे समन्वयक डॉ. संतोष डोपे, संचालक प्रा. तेजस कराड, जिल्हा कारागृह अधीक्षक बी. एन. मुलानी, उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी, प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, प्राचार्य सायस मुंढे, डॉ. विराज सोळंके, डॉ. सचिन गरुड, आशा मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना प्रेरणा होनराव म्हणाल्या, 'विश्वमैदान' ही संकल्पनाच प्रेरणादायी आहे. हे नाव उच्चारताच प्रत्येकाच्या आयुष्यातील संघर्षाच्या मैदानाची जाणीव होते. लातूर मध्ये वैद्यकीय शिक्षणाची मोठी चळवळ उभी करून डॉ. हनुमंत कराड यांनी शिक्षणाचा नवा आदर्श निर्माण केला आहे. माईर एमआयटी समूह केवळ शैक्षणिक गुणवत्तेलाच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्कृती आणि क्रीडा क्षेत्रालाही तेवढेच महत्त्व देत असल्याचे त्यांनी नमूद केले.

महिला सक्षमीकरणाचा मुद्दा उपस्थित करताना त्यांनी मुलींच्या क्रीडा क्षेत्रातील वाढत्या सहभागाची गरज अधोरेखित केली. राजकारण आणि प्रशासनात महिलांची उपस्थिती वाढत असली, तरी आपल्या भागातील मुलींचा क्रीडा स्पर्धांमधील सहभाग अजूनही अधिक वाढण्याची आवश्यकता आहे. पुढील वर्षी 'विश्वमैदान' मध्ये मुलींचा अधिकाधिक सहभाग दिसावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मुली मैदानात उतरल्या की त्या जिद्दीने यश संपादन करतात, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कर्करोग शल्य चिकित्सक डॉ. ब्रिजमोहन झंवर म्हणाले की, खेळ केवळ शारीरिक सुदृढता देत नाही, तर तो शिस्त, वेळेचे नियोजन आणि आत्मसंयमही शिकवतो. ही कौशल्ये कोणत्याही क्षेत्रात यश मिळवण्यासाठी अत्यावश्यक असतात. विजयाने गर्विष्ठ होता कामा नये आणि पराभवाने खचूनही चालत नाही; कारण प्रत्येक पराभव हा पुढील मोठ्या विजयाची पहिली पायरी असतो, असे ते म्हणाले.

आजची तरुण पिढी मोबाईल आणि सोशल मीडियाच्या आभासी जगात अडकत चालल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. या डिजिटल जगातून बाहेर पडून विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष मैदानावर घाम गाळणे आवश्यक आहे. त्यातूनच शारीरिक आणि मानसिक आरोग्य अधिक सक्षम राहते, असे त्यांनी सांगितले.

डॉ. आरती झंवर यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्यदायी जीवनशैलीवर भर दिला. केवळ पुस्तकी ज्ञानात अडकून न पडता शारीरिक स्वास्थ्याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. पोषणयुक्त आहार, नियमित व्यायाम, मानसिक ताणतणावाचे योग्य नियोजन आणि पुरेशी झोप हे आरोग्याचे चार मूलभूत स्तंभ असल्याचे त्यांनी सांगितले.

आपल्या महाविद्यालयीन जीवनाच्या आठवणींना उजाळा देताना त्यांनी सांगितले की, चार भिंतींच्या आत सतत बसून राहिल्याने शरीराला आवश्यक व्हिटॅमिन डी मिळत नाही आणि थकवा जाणवू लागतो. त्यामुळे मैदानी खेळ हा केवळ विरंगुळा नसून, तो शारीरिक ऊर्जेचा महत्त्वाचा स्रोत आहे. ही खेळाची सवय स्पर्धे पुरती मर्यादित न राहता आयुष्याचा कायमस्वरूपी भाग व्हावी, असे त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले.

जिल्हा कारागृह अधीक्षक बी. एन. मुलानी म्हणाले की, 'विश्वमैदान २०२६' मुळे महाविद्यालयीन तरुणांमधील क्रीडा वृत्तीला चालना मिळाली आहे. या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ खेळण्याची संधी मिळालेली नाही, तर त्यांच्यात आत्मविश्वास, संघभावना आणि स्पर्धात्मकता विकसित झाली आहे, असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात प्रा. तेजस कराड यांनी पाच दिवसीय 'विश्वमैदान क्रीडा स्पर्धे' चा सविस्तर आढावा सादर केला. यानंतर विविध क्रीडा प्रकारांतील विजेत्या खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते चषक आणि प्रमाणपत्रे प्रदान करून गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रणोती चिंचणसुरे आणि डॉ. प्राजक्ता गायकवाड यांनी केले, तर आभार डॉ. वर्षा सांगळे यांनी मानले. या समारंभास लातूर जिल्ह्यातील विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील विद्यार्थी, प्राध्यापक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

फिनिक्स हॉस्पिटल व रोटरी क्लब लातूर सेंट्रलच्या वतीने आयोजित आरोग्य शिबिरास प्रतिसाद



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ०५ एप्रिल : लातूर तालुक्यातील चिखुर्डा गावामध्ये बाळनाथ स्वामी सप्ताह निमित्त भव्य मोफत रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये फिनिक्स हॉस्पिटल लातूर व रोटरी क्लब लातूर सेंट्रल यांच्या वतीने आयोजित भव्य मोफत रोग निदान शिबिरात आज मोठ्या उत्साहात कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानदेव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट, चिखुर्डाचे अध्यक्ष सुरेशराव (तात्या) भुजंगराव कदम हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून जि. प. सदस्या अश्विनीताई दत्तात्रय शिंदे, पं. स. सदस्या दिपालीताई अनिल कराड, तसेच पं. स. सदस्य बाळासाहेब कदम यांची उपस्थिती लाभली. याप्रसंगी मांजरा विकास सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोकआप्पा काळे, विलास सहकारी साखर कारखानाचे माजी उपाध्यक्ष रविंद्र काळे, रोटरी क्लब लातूर सेंट्रलचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे, चिखुर्डा गावच्या सरपंच रंजनाताई हनुमंतराव कदम यांच्यासह रोटरी क्लबचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिरामध्ये एकूण ५२० जणांची तपासणी करण्यात आली. शिबिरात फिनिक्स हॉस्पिटलचे संचालक डॉ. अभिजीत यादव, डॉ. अमोल शेकडे, डॉ. भाग्यलक्ष्मी यादव, डॉ. संदीप जाधव, डॉ. गणेश कुलकर्णी, डॉ. पवन सावंत यांनी आपली मोलाची सेवा दिली. त्यांनी बीपी, मधुमेह, संधिवात, थायरॉईड, मूत्रपिंड (किडनी) विकार, पोटाचे आजार, कावीळ, यकृत विकार, दमा, मुळव्याध, हर्निया, गाठीचे आजार, स्त्रीरोग, घसा व डोळ्यांचे आजार अशा विविध आजारांवर तपासणी करून आवश्यक ते उपचार व मार्गदर्शन केले.

या शिबिराला चिखुर्डा तसेच पंचक्रोशीतील गावातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मोठ्या संख्येने रुग्णांनी आरोग्य तपासणी व उपचारांचा लाभ घेतला. शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे आभार व्यक्त करण्यात आले.

न्यूनगंड न बाळगता आत्मविश्वासाने पुढे चला : डॉ. संदीपान जगदाळे



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ०५ एप्रिल : ''ऐकू किंवा बोलता येत नसले तरी आपल्या प्रतिभेच्या जोरावर प्रत्येकजण यशस्वी होऊ शकतो.'' दिव्यांग विद्यार्थ्यांनी न्यूनगंड न बाळगता आत्मविश्वासाने पुढे जावे असे आवाहन प्रा. संदीपान जगदाळे यांनी केले.

रोटरी क्लब लातूरच्या वतीने सौ. सुशिलादेवी देशमुख निवासी मूकबधीर विद्यालय, सिग्नल कॅम्प, लातूर येथील विद्यार्थीनींसाठी ईद मिलन कार्यक्रमाचे आयोजन गुरूवारी सायंकाळी करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष ज़की खान कायमखानी होते. त्यांच्या पुढाकारातूनच हा ईद स्नेह मिलन कार्यक्रम उत्साहात पार पडला. मंचावर प्रमुख पाहुणे जयसिंगराव देशमुख व धनंजय राव देशमुख हे होते.

यावेळी विद्यार्थिनींसोबत स्नेहसंवाद साधत फेलोशिपचा आनंद घेतला गेला. तसेच संस्थेतील महिला कर्मचाऱ्यांना साड्या देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान चित्रकला स्पर्धेत यश मिळवलेल्या मूक-बधीर विद्यार्थिनींना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. यावेळी रो. डॉ. संदीपान जगदाळे यांनी प्रभावी मार्गदर्शन करत रोटरीच्या कार्याचा उद्देश, शांततेचे महत्त्व आणि एकत्रितपणे राहण्याची गरज यावर भाष्य केले. यावेळी त्यांनी सुधा चंद्रण व अरुणिमा सिन्हा यांच्या प्रेरणादायी उदाहरणांचा उल्लेख करून विद्यार्थिनींमध्ये नवी ऊर्जा निर्माण केली. डॉ. जगदाळे यांचे भाषण शिक्षक बंकट पवार यांनी संकेत भाषेत विद्यार्थिनींना समजावून सांगितले. या समरस आणि भावनिक क्षणाने उपस्थितांची मने भारावून गेली. हा कार्यक्रम सर्वांसाठी अविस्मरणीय ठरला.

सूत्रसंचालन बंकट पवार यांनी केले. आभारप्रदर्शन रो. बाबुराव सोमवंशी यांनी केले. या प्रसंगी रोटरीचे सचिव विश्वनाथ निगुडगे, प्रोजेक्ट चेअरमन रो. बाबुराव सोमवंशी, रो.रामप्रसाद राठी, रो. उत्तरेश्वर हेरकर, रो. विलास जिल्हावर, रो. राजकुमार गिरवलकर रो. महेंद्र जोशी, रो. नरेश कोरे , सुधाकर कोटगिरे, नानिक जोधवानी यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थिती होते.

कु.नंम्रता स्वामीचे पोलीस दलात यश युवकांना प्रेरणा देणारे

पोलीस निरीक्षक अनंत भंडे, हमाली करणाऱ्याची कन्या बनली पोलीस

तभा वृत्तसेवा/शंकर मिटकर

शिरूर अनंतपाळ, दि. ०४ एप्रिल : शिरूर अनंतपाळ तालुक्यातील मौजे थेरगाव येथील सामान्य कुटुंबात जन्माला आलेली कु. नम्रता मन्मंथ स्वामी या १९ वर्षीय मुलीने जिद्द व अथक परिश्रमाने नुकत्याच झालेल्या नांदेड जिल्हा पोलिस भरती मध्ये पहिल्याच प्रयत्नात यश संपादन केले या तिच्या यशाबद्दल महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई शाखा शिरूर अनंतपाळ तालुका अध्यक्ष शंकर मिटकर यांच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालय थेरगाव येथे जिल्हा परिषद सदस्य सौ.तुळसाबाई लोंढे यांच्या हस्ते कु.नंम्रता व तिचे आई - वडील यांचा शालश्रीफळ : व पुष्पगुच्छ देवुन सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित पोलीस निरीक्षक अनंत भंडे, जिल्हा परिषद सदस्य तुळसाबाई लोंढे, पंचायत समिती सभापती संजय सुर्यवंशी, जगदिप लोंढे,ग्रामविकास अधिकारी किशोर विभुते, सरपंच सौ रेखा जाधव, सामाजिक कार्यकर्ते पत्रकार शंकर मिटकर, रामदास भुसागरे माजी सरपंच हिप्पळगाव, व्यंकट माने, उपसरपंच सुनील शिंदे, सदस्य अविनाश शिंदे,नंम्रताचे आजोबा गंगाधर स्वामी, वडील मन्मंथ स्वामी,आई निर्मला स्वामी,दयासागर सुर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी नवतरुणांना मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक अनंत भंडे यांनी गरीब परिस्थितीत यश संपादन करणे अशक्य वाटत असले तरी दृढ निश्चय, कठोर परिश्रम आणि योग्य नियोजनाच्या जोरावर यश संपादन करणे शक्य आहे. शिक्षणावर भर देणे, ध्येये निश्चित करणे, आणि उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करून यातून गरिबीवर मात करून यशाची शिखरे गाठता येतात कु.नंम्रता यांनी संपादन केलेले यश हे सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना प्रेरणादायी आहे. सद्या अनेक तरुण कामधंदा नसल्याने बेकार मोकाट फिरताना दिसतात.याचे कारण म्हणजे आळस झटकून अभ्यास केला तर कोणत्याही प्रकारची सहजपणे परिक्षा देऊन त्यात यश संपादन करता येते.नंम्रताच्या वडिलांची परिस्थिती हलाखीची होती त्यांनी आपल्या मुलीची जिद्द आणि चिकाटी तिचा आत्मविश्वास पाहून त्यांनी लातूर येथे जाऊन हमाली केली.आणि नम्रताचे शिक्षण पूर्ण केले. वडीलांचे कष्ट वाया जाणार नाहीत याची काळजी घेवून तीने कठोर परिश्रम घेऊन आज ती पोलीस दलात भरती झाली तीचा हा आदर्श नवतरुणांनी घ्यावा तसेच व्यसनापासून दूर रहा मोबाईलचा वापर कमी करा अशी भावना व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी सभापती संजय सुर्यवंशी हे बोलताना म्हणाले की जिद्द



असेल तर कठीण परिस्थितीतही यश नक्की मिळते गरीबीतून यश संपादन करणे आणि चिकाटी, कठोर मेहनत हे जिद्दीचे उत्तम उदाहरण आहे.

कु. नम्रता स्वामी हीच्या यशाची कहाणी समाजातील सामान्य कुटुंबातील अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरते, जी दाखवते की 'गरीबी' हा यशातील अडथळा नसून जिद्दीची परीक्षा आहे अशी भावना व्यक्त केली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर विभुते यांनी केले तर आभार सामाजिक कार्यकर्ते प्रताप जाधव यांनी मानले.